परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष ११ • अंक ३ • ऑगस्ट–सप्टेंबर २०१७

### मुखपृष्ठाविषयी

आदरणीय दादी प्रकाशमणीजी सन १९६९ ते २००७ या ३८ वर्षाच्या कालखंडात संस्थेच्या मुख्य प्रशासिका होत्या. त्या काळात १३३ देशातून सुमारे ८५०० सेवाकेंद्रे उघडण्यात आली. याचेच प्रतीक म्हणून विश्वाच्या ग्लोबवर शिवबाबांचा झेंडा फडकवितांना दादीजींना दर्शविण्यात आले आहे. (त्यांच्या समवेत अथक सेवाधारी ब्र.कु. मुन्नी बहेन उभ्या आहेत)

दादीजींनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर फार मोठे कार्य केले. याचेच प्रतीक म्हणून भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. कलाम तसेच मा. मदर टेरेसा यांच्याशी ज्ञानचर्चा करतांना दादीजींना दर्शविण्यात आले आहे. त्याचबरोबर सन १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे दादीजींना 'शांतीदूत पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तो ऐतिहासिक प्रसंग दर्शविण्यात आला आहे. मुख्य म्हणजे दादीजींचे चुंबकीय व्यक्तीमत्व सर्वांना आकर्षित करणारे, आनंददायी व प्रेरणादायी होते. अशा विश्ववंदनीय दादीजींना दि. २५ ऑगस्ट २०१७ रोजी, त्यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त, आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी कोटी प्रणाम!

- प्रकाशक अमृतकुंभ




१. दादी प्रकाशमणीजींचे अमृतवचन... २
२. सर्व गुणांची खाण - दादी प्रकाशमणीजी (संपादकीय).... ४
३. रक्षाबंधनाचे पावन पर्व.... ६
४. जीवनात खुशी कशी प्राप्त कराल ?.... ९
५. आकाशी झेप घे रे पाखरा.... ११
६. म्हातारपण अभिशाप नसून, एक वरदान आहे-.... १३
७. सचित्र सेवावृत्त .. १६
८. श्रीकृष्ण जन्माष्टमी .... १८
९. ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता...१९
१०. शपथ सारे घेऊ या (कविता) .... २१
११. मनुष्य सृष्टीला प्रदूषित करणाऱ्या .... २२
१२. अलौकिक (ईश्वरीय) जी.एस.टी.... २६
१३. कर्मयोग, भक्तियोग आणि बी.के राजयोग.... २७
१४. मूल्य शिक्षण - एक शैक्षणिक क्रांतिकारी चळवळ .... २९
१५. बिगडी को बनानेवाला बाबा ! (अनुभव) .... ३१




**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :** संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३ फोन: ०२२-२५३२२२०८. • E-mail :info@amrutkumbh.com. • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता:** बी.के. गोदावरी, **प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :** प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.
**मोबाईल : ९८२००२३०९२**

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट,२२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम)- ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले- संपादक ब्र.कु. शिवाजी चौधरी • संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर ॲण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, प्लॉट ३. सेक्टर ३, आरएससी चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७.

**वार्षिक वर्गणी रु. ६५/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**

**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या - www.amrutkumbh.com**

# दादी प्रकाशमणीजींचे अमृतवचन



**एकरस स्थिती बनविण्याच्या विविध युक्त्या-**

१)एकरस स्थिती बनविण्यासाठी पाहून सुद्धा न पाहणे- ही एक उत्तम साधना आहे. काही लोकांचे म्हणणे असते की, तरीही डोळ्यांनी तर दिसणारच आहे. आम्ही डोळे बंद करू शकत नाही. परंतु ज्याला आपल्या घराची-परमधामाची आठवण आहे, ज्याची उपराम वृत्ती होते, तो पाहूनही न पाहण्याचा अभ्यास करतो. ज्यांनी या जुन्या दुनियेचा वृत्तीने संन्यास केला आहे, जे स्वतः स्वतःचे परीक्षण करतात, की माझा कुठे लगाव किंवा झुकाव तर नाही ना? तेच पाहून सुद्धा न पाहण्याचा अभ्यास करू शकतात. कोणाकडे ही बुद्धीची रग जाणे फार नुकसानकारक आहे. आसुरी वृत्तीच्या व्यक्तीकडे जर बुद्धीचा झुकाव असेल, तर ती व्यक्ती आपल्याप्रमाणे बनवितेच! याउलट एखाद्या सत्प्रवृत्तीच्या व्यक्तीकडे आपल्या बुद्धिचा झुकाव असेल तरी आपण फरिश्ता बनू शकणार नाही.

२) **जोपर्यंत स्वतःची आत्मिक वृत्ती नाही तोपर्यंत एकरस स्थिती बनू शकणार नाही. आत्मीयतेचा रस सुख-शांती देणारा आहे.** जर आसुरी वृत्तीकडे ओढा असेल, तर त्याचेच आकर्षण होईल आणि शिवबाबांकडून आत्मिक रस प्राप्त करू शकणार नाही. ज्याप्रमाणे आईच्या नाभीतून गर्भातील मुलाचे पोषण होते त्याप्रमाणे अलौकिक माता पित्याशी असलेल्या आपल्या सूक्ष्म संबंधाची सूक्ष्म शक्ती आपली दिव्य अलौकिक जन्माची पालना करते. ज्यांना हा रस मिळाला आहे त्यांच्या बुद्धीचा ओढा अन्य कोणत्याही ठिकाणी जात नाही. हा रस प्राप्त केल्याशिवाय ईश्वरीय संतान असण्याचा नशा चढू शकत नाही. शुद्र जीवन बदलून ब्रह्मा मुखवंशावळी ब्राह्मण तर झालो. परंतु ब्राह्मण ही नंबरवार आहेत.

जसे कुख वंशावळी ब्राह्मणात एक असतात- श्राद्धाचे जेवणारे. ते गृहस्थींच्या घरचे खातात. दुसरे आहेत, पुष्करणी ब्राह्मण - जे तीर्थ स्थानी पंडे म्हणून असतात. काही जन्मपत्रिकेवरून ज्योतिष सांगणारे असतात. काही ब्राह्मण ग्रहचारी संपविण्यासाठी उपाय सांगणारे असतात, तर काही लग्न लावून देणारे असतात. जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व कार्यामध्ये ब्राह्मणांची उपस्थिती अनिवार्य असते. काही ब्राह्मण करणीघोर असतात. मेलेल्या माणसांचे कपडेही वापरतात. ज्या प्रकारचे कार्य करणारे ब्राह्मण असतात त्यांना त्या प्रकारच्या वस्तू दिल्या जातात. त्यांना दक्षिणा आणि जेवणही तसेच मिळते.

आता आपण स्वतःला पाहायचे आहे की, मी ब्रह्मा मुखवंशावळी ब्राह्मण आहे तर माझी स्थिती कर्म कसे आहेत. या जुन्या दुनियेतून बुद्धीला काढण्यासाठी जे युद्ध करतात, ते पक्के ब्राह्मण नाहीत. ज्यांनी स्वतः ईश्वराला आपला पती मानले नाही, ते इतरांचे लग्न ईश्वराशी काय लावणार? त्यांचा योग शिवबाबांशी कसा जोडणार?

३) शिवबाबांना ओळखून त्यांचे संतान बनल्यावर आपण आपल्या स्थितीवर लक्ष केंद्रित करायला पाहिजे. आपली स्थिती कोणीही चलायमान करू शकत नाही. कितीही संकटे आली तरी एक बळ एक भरोसा या आधाराने स्थिती चांगली बनते. स्थिती मजबूत करण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची लिस्ट आपणाकडे हवी. **एकरस स्थिती बनविण्यासाठी सर्वप्रथम अंतर्मुखी राहायला पाहिजे. बहिर्मुखतेचे आकर्षण संपविले तरच मन एकाग्र होते. एकाग्रचित बनण्यासाठी सामावून घेण्याची शक्ती, सहनशक्ती व समेटून घ्यायची शक्ती पाहिजे.** एकाही शक्तीच्या कमतरतेमुळे एकाग्रचित्त होऊ शकणार नाही. विस्ताराने विचार करणारा, विस्ताराने बोलणारा केव्हाही एकाग्र होऊ शकत नाही. सामावून घ्यायची शक्ती असणारा मास्टर ज्ञानाचा सागर बनू शकतो. जी गोष्ट घडून गेली ती घडून गेली. त्याचा विचार न करता, त्या विचारांना थांबवून एकाग्रचित्ताने शिवबाबांची आठवण सुरू करा. जे काही घडते आहे ते साक्षी होऊन पहा. काय झाले? कसे झाले? का झाले? या

प्रश्नांमुळे स्थितींची चलबिचल होते. या व्यर्थ विचारांमुळे बुद्धी एकाग्र होऊ शकत नाही. एकाग्रचित्त राहणारा शिवबाबांकडून गुप्त शक्ती प्राप्त करू शकतो. आपल्याला ईश्वरीय शक्तीच चालवत आहे, असा अनुभव येतो. अनावश्यक विचारांमध्ये वेळ घालवणे सोडून द्या आणि शिवबाबांशी बुद्धियोग जोडून आनंदमय स्थिती अनुभवा. त्या स्थितीमध्ये सुख-शांती प्रेम सामावलेले आहे. आनंदमय स्थितीमुळे आपण बापसमान बनतो. इतर सर्व काही सोडून बाबांना फॉलो करा. जो एक शिवबाबांनाच पाहतो, त्याला बाकी कोणत्याच गोष्टी दिसत नाहीत. त्याचे प्रत्येक कर्म कल्याणकारीच असते. आम्ही किती भाग्यवान आहोत, की कल्याणकारी बाबांच्या पावलांवर पावले टाकतो, त्यांचे अनुसरण करतो. चित्रात देवतांच्या पावलांमध्ये कमळ (पद्म) म्हणूनच दाखवितात. कारण त्यांनी प्रत्येक कर्मात पित्याचेच अनुकरण केले आहे.

४) **शिवबाबांनी आपल्याला आठवण करून दिली आहे. मुलांनो हा तुमचा शेवटचा जन्म आहे. तुम्ही आता तुमच्या शरीरासहित, शरीराच्या नातेसंबंधांना विसरा. शिवबाबांनी आम्हाला यज्ञाचे सेवक बनविले.** आम्ही ब्राह्मण बनलो. ब्राह्मणच आपल्या श्रेष्ठ कर्मांनी पुढील जन्मात देवता बनू शकतात. ज्याप्रमाणे शिवबाबांचे नाव गुणवाचक आहे. (शिव म्हणजे कल्याणकारी) तसे आपलेही नाव गुण, कर्तव्यावर आधारित आहे- ब्राह्मण! आपला पिता वृक्षपति कल्याणकारी आहे. या स्मृतीमध्ये जो राहतो, त्याच्यावर कधी ग्रहचारी बसत नाही. धन, संबंध व शरीरावर ग्रहचारी बसते. जेव्हा आम्ही वृक्षपति शिवबाबांची संतान बनतो, तेव्हा शरीरावरील ग्रहचारी संपली संबंधात सुख आले. भांडण होऊच शकत नाही. संपत्तीसाठी कोणाकडे हात पसरावे लागत नाहीत. आम्ही ईश्वर-दाताची मुले आहोत. बृहस्पतिची दशा आहे. बृहस्पतिची मुले सुखीच असतात. त्यामुळे मी वृक्षपति पित्याचे संतान आहे. हे वरदान सदैव स्मृतीत ठेवा. मी ब्रह्मा मुखवंशावली ब्राह्मण, सर्वांची जन्मकुंडली जाणणारा आहे. सफलतेचा तारा आहे- माझ्यावर कधीच ग्रहचारी बसू शकत नाही. जर ती आलीच तर ती मी सहज दूर करू शकतो. जे पक्के ब्राह्मण आहेत, ते इतरांची ग्रहचारी देखील दूर करू शकतात. नीच प्रकारचे जे ब्राह्मण असतात, ते ईर्ष्या करणारे असतात. कोणी सुखी बघून त्यांचे सुख ते सहन करू शकत नाहीत. काही जण एकमेकांशी स्पर्धा करतात, तुलना करतात, टीका-टिप्पणी करतात. त्यांची कधीही एकरस स्थिती बनू शकत नाही. त्यांना इतरांचे आशीर्वाद कधीच मिळत नाहीत.

ज्याची स्थिती श्रेष्ठ असेल तर त्याला आशीर्वाद स्वतःहून मिळतात. तो फक्त शिवबाबांनाच पाहतो. जुन्या दुनियेकडे त्याचे लक्ष नसते. जुन्या दुनियेतील माणसांकडे त्याचे लक्ष नसते. कुठे काय घडत आहे, कसे घडत आहे, याविषयी आपल्याला काय करायचे आहे? इतरांची चेकिंग करण्याची जबाबदारी आपल्याला मिळाली आहे का? प्रत्येकाला जबाबदारी आहे ती केवळ स्वतःला सांभाळण्याची. जो स्वतः स्वतःला सांभाळत नाही, त्याला बाबा काहीच जबाबदारी देत नाहीत. माझा सांभाळ कोणी करू नये - नाहीतर त्यांचे माझ्यावर ओझे पडेल. मी काही लहान मूल थोडंच आहे, की कोणी माझा सतत सांभाळ करावा. स्वतःची स्थिती स्वतः, सांभाळावी. मुख्य म्हणजे आपली स्थिती मजबूत बनविणारा, ईश्वरामध्ये मग्न राहणाराच खरा समजूतदार आहे.

५) **घडून गेलेल्या घटनांकरिता त्रासणे, योग्य नाही. जर त्यासाठी रडत बसाल, तर स्थिती एकरस होणार नाही.** आपल्या मर्जीप्रमाणे काम झाले नाही तर स्थितीमध्ये चलबिचल होते. माझी मर्जी कुठून आली ? आपली नेहमी सर्वांसाठी शुभ भावना, शुभ कामनाच असावी. सृष्टी नाटकात तशीच नोंद आहे. आपण कधीही भांडू शकत नाही, कारण **आपण अपकार कारणाऱ्यांवरही उपकार करणारे आहोत. तोंडाचा पट्टा चालवू नये. जर चेहऱ्यावरचे भाव बदलले तर तेही योग्य नाही. म्हणून स्वतः जितके लक्ष ठेवाल, तितके चांगले आहे.** अंतर्मुखी व्यक्तीच आत्मपरीक्षण करू शकते. कोणत्याही परिस्थितीत स्वतः ला चेक करा आणि बाबांना फॉलो करा. ज्यांचे शिवबाबांकडे लक्ष नाही, बाबाही त्यांच्याकडे पाहत नाहीत. आत्मपरीक्षण करणाऱ्यास स्वतःमधील कमी-कमजोरी दिसतात. जो स्वतःमधील कमी-कमजोरी स्वीकार करतो, बाबा त्याला ईशारा देतात. मग तो कोणाद्वारेही देतात किंवा स्वप्नातही ईशारा देतात. आपल्याला संपूर्ण बनायचे आहे, शिवबाबा बनविणारे आहेत. ते आपल्यात कोणतीही कमी राहू देणार नाहीत. जर मला माझ्यात काहीही कमी ठेवायची नाही, तर स्वतःमध्ये काय कमी आहे ते जरूर समजते. संपूर्ण

पान क्र. ८ वर

संपादकीय...

# सर्व गुणांची खाण– दादी प्रकाशमणीजी

या भारतभूमीवर अनेक महान विभूती जन्माला आल्या, ज्यांनी मोठे झाल्यावर ईश्वराचा शोध घ्यायचा प्रयत्न केला व या जगात थोर पदाला पोचल्या. परंतु या सृष्टीवर अशी एक विभूती जन्माला आली, जिला स्वयं परमेश्वराने पारखले व नाव दिले – 'प्रकाशमणी'. दादीजींनी आपले हे नाव खरोखर सार्थ केले. त्यांनी देश-विदेशांतील लाखो आत्म्यांना ईश्वरीय ज्ञानाचा प्रकाश दिला व त्यांना मनुष्यापासून देवता बनण्याची प्रेरणा दिली. त्यामुळे दादीजींचे जीवन एखाद्या दिव्य प्रकाशस्तंभाप्रमाणे होते. दादीजींमध्ये संपूर्ण पवित्रता असल्याने त्या जणू सर्व गुणांची खाण होत्या. दादीजी बालब्रह्मचारिणी, महान त्यागी, तपस्वीमूर्त तसेच विश्वसेवाधारी, शिवशक्तीस्वरूपा होत्या. **त्यांनीच विश्वातील सर्व आत्म्यांना परमात्मा शिव पित्याचा परिचय देऊन, विश्वबंधुत्व भावना प्रसारित करण्यासाठी, जीवन समर्पित केले. सन १९६९ ते २००७ या सुमारे ३८ वर्षाच्या कालावधीत दादींजी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रशासिका होत्या. या कालावधीत त्यांनी सुमारे १३३ देशांतील बंधुभगिनींना ईश्वरीय संदेश प्रदान करण्याचे सर्वश्रेष्ठ महान कार्य केले. त्यामुळे दिनांक २५ ऑगस्ट २०१७ रोजी असलेल्या त्यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त आपण सारे ब्रह्मावत्स विश्वभरात 'विश्व बंधुत्व दिवस' मोठ्या उत्साहाने साजरा करू या.**

**दादीजींचे अलौकिक जीवन–**

दादीजींचा जन्म सन १९२२ मध्ये हैदराबाद (सिंध) मध्ये, एका धार्मिक परिवारात झाला. त्यांचे बालपणीचे नाव 'राधा' असे होते. वयाच्या १४ व्या वर्षी, सन १९३६ मध्ये सिंध हैदराबाद येथील 'ओम् मंडळी' या सत्संगात एक आज्ञाधारक, सुशील कुमारी म्हणून दादीजींचे आगमन झाले. (पुढे याच 'ओम् मंडळी' चे नाव 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' असे ठेवण्यात आले.) त्यांनी 'प्रजापिता ब्रह्मा' यांच्या साकार शरीरात अवतरित, परमात्मा शिवपित्याला ओळखले. लगेचच त्यांनी स्वतःला ईश्वरीय सेवेत समर्पण केले. आपल्या हातून विश्वसेवा व्हावी तसेच विश्वातील सर्व आत्म्यांना सुख-शांती प्राप्त व्हावी, हीच त्यांची शुभभावना व शुभकामना होती. त्यांना ईश्वरीय परिवाराविषयी अतिशय प्रेम होते. त्यामुळे पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांना यज्ञातील लहान मुलांचे टीचर म्हणून पदभार दिला. त्यावेळी दादीजी केवळ १५ वर्षांच्या होत्या व यज्ञवत्स १० वर्ष वयाचे होते. दादींजींनी टीचरची भूमिका अतिशय उत्तम प्रकारे पार पाडली. पिताश्रींनी दिलेले निर्देश, श्रीमत अथवा इशारे त्या मनापासून ग्रहण करीत असत, लगेचच त्यांची पूर्तता देखील करीत असत. त्यामुळे 'दादीजी' सर्व यज्ञवत्सांकरिता उत्तम मार्गदर्शिका बनल्या होत्या. **दादीजी आपल्या जीवनातील प्रत्येक कर्म मग ते स्थूल असो वा सूक्ष्म, अतिशय कुशलतापूर्वक करीत असत. त्यामुळे त्यांचा प्रत्येक संकल्प, बोल व कर्म विशेषता संपन्न असे. दादीजींचे व्यक्तिमत्व दिव्य आणि ओजस्वी होते.** त्यांच्या संबंध संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला आईची भासना मिळत असे. त्यामुळे सर्वजण त्यांना आदराने 'दादी माँ' असे म्हणत असत. त्यांचे हृदय अतिशय विशाल होते. परिणामतः त्यांची आपुलकीची भावना प्रत्येक आत्म्याला प्रभावित करीत असे. **दादीजींनी एवढ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय संस्थेचे संचालन केले. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर चिंतेची छटा कधीही दिसली नाही. कारण त्यांच्यात निमित्त व निर्माण भाव होता. आपण केवळ निमित्त आहोत, कर्ताकरविता शिवबाबा आहे हाच भाव सदैव त्यांच्या हृदयात भरलेला होता.** दादीजींचा सहवास हा जणू परिसस्पर्शाप्रमाणे होता. त्यामुळेच लाखो आत्म्यांच्या जीवनात अद्भुत परिवर्तन घडून आले. दादीजी संस्थेच्या मुख्य प्रशासिका असतांना, देश-विदेशातून ८५०० हून अधिक सेवाकेंद्रे उघडण्यात आली व सुमारे ८ लाखापेक्षाही अधिक बंधुभगिनी राजयोगी बनले. दहा हजाराहून अधिक ब्रह्माकुमारी भगिनी ईश्वरीय कार्यासाठी समर्पित झाल्या ज्यांनी पुढे टीचरची भूमिका समर्थपणे पार पाडली. **फलस्वरूप आपली ही संस्था खऱ्या अर्थी 'विश्व विद्यालय' म्हणून नावारूपाला आली. यावरून आपल्या लक्षात येईल की दादीजी खरोखर 'प्रभुरत्न' होत्या. त्यांची महिमा अवर्णनीय अशी आहे.**

**प्रसन्नतेची मूर्ती-दादी प्रकाशमणी–**

दादीजी सदैव हर्षितमुख व प्रसन्न रहात. दादीजींचा खुशनुमा चेहरा सर्व ब्राह्मण परिवारासाठी सर्वोत्तम आकर्षण

होता. मधुबनला गेल्यावर दादीजींना सन्मुख भेटण्याची, त्यांची स्नेहमयी वरदानी दृष्टी घेण्याची, त्यांच्या हातून टोली (प्रसाद) व सौगात प्राप्त करण्याची प्रत्येक ब्रह्मावत्साला तीव्र इच्छा असे. दादीजींना भेटल्यावर बेहद ईश्वरीय परिवाराची भासना प्रकर्षाने होत असे. **दादीजींचा सकाळचा मुरली क्लास म्हणजे जणू एक आनंदोत्सव अनुभवाला येत असे. दादीजी केवळ मुरली वाचत नसत तर मुरलीतील ज्ञानाची प्रथम धारणा करून, मगच ते दुसऱ्यांना देत असत.** त्यामुळे ऐकणाऱ्यांना त्या ज्ञानाची धारणा सहजच होत असे. मुरली संपल्यावर जेव्हा ब्रह्मावत्स हॉलच्या बाहेर पडत असत तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत असे. मुरलीतील एक-एक महावाक्य त्यांच्या हृदयाला भिडत असे. फलस्वरूप प्रत्येकाचे हृदय शुद्ध होऊन जात असे व एक शिवबाबा त्यांच्या हृदयमंदिरी विराजमान होत असे.

दादीजींची दृष्टी महासुखकारी होती. दादीजींमध्ये अतिशय विनम्रता होती. त्यामुळे साधु-संत, महामंडलेश्वर व अन्य धर्मांचे नेतेसुद्धा दादीजींचा मनापासून सन्मान करत असत. त्यांच्या जीवनात सत्यता होती. म्हणून त्यांच्यासमोर कोणीही असत्य बोलू शकत नव्हते. त्यांच्या मुखाद्वारे सदैव उमंग-उत्साहाचे बोल निघत असत. फलस्वरूप ब्राह्मण परिवारात उमंग-उत्साहाची लहर पसरत असे. दादीजींचे पाऊल जेथे पडत असे तेथील वातावरण शुद्ध, अलौकिक शक्तीशाली होत असे.

दादीजींचे अलौकिक जीवन सर्वांसाठी आदर्श व मार्गदर्शक होते. त्यांच्या चेहऱ्यावरील आत्मिक खुशी व आत्मिक नशा, अनेकानेक आत्म्यांना ज्ञानमार्गाकडे आकर्षित करणारा होता. दादीजींचा चेहरा जणू त्यांच्या मनाचा आरसा होता. दादीजींच्या मनातून सदैव सद्भावना व श्रेष्ठ विचारांची सरिता वाहत होती. परिणामतः दादीजी सर्वांना ईश्वरीय सेवेसाठी प्रेरणा देत असत तसेच स्वतःही सहभागी होऊन, सर्वांचा उमंग-उत्साह वाढवित असत. मधुवनमध्ये शिबिरासाठी जे 'भाई-बहन' येत असत, दादीजी त्यांना अतिशय प्रेमाने ज्ञान समजावून सांगत असत. फलस्वरूप दादीजींद्वारे अनेकांना अलौकिक अनुभूती होत असत. दादीजींची सर्वात मोठी विशेषता ही होती की त्या सर्वांना निस्वार्थ प्रेम देत असत. मग ते व्ही. आय.पी. असोत किंवा अन्य कोणी असोत. त्यामुळे सर्व जण त्यांना आपली दादी समजत.

**दादीजींचे जीवन कोहिनूर हिऱ्यासारखे होते-**

**दादीजींचे हृदय अत्यंत स्वच्छ, साफ, सरळ आणि विशाल होते. दादीजी दैवी गुणांची खाण होत्या. त्या जणू या साकार सृष्टीवर अवतरित फरिश्ता (देवदूत) वाटत होत्या. त्या नेहमी विश्वातील सर्व आत्म्यांच्या कल्याणाचा विचार करीत असत.** विश्वातील सर्व आत्म्यांना परमात्मा पित्याचा परिचय कसा देता येईल, सर्वांचे जीवन दुखः मुक्त कसे करता येईल, राजयोगाचा मार्ग दाखवून सर्वांना सदासुखी कसे करता येईल हेच विचार त्यांच्या मनात असत. त्यासाठी त्यांनी अहोरात्र ईश्वरीय सेवा केली व एखाद्या चंदनाप्रमाणे आपले जीवन विश्वसेवेसाठी झिजवले.

**दादीजींचे जीवन एखाद्या कोहिनूर हिऱ्याप्रमाणे प्रकाशमान व सर्वांना आकर्षित करणारे होते. त्यांना पाहताच प्रत्येकाला असा आभास होत असे की या जणू देवी आहेत, शिवशक्ती आहेत, महान आत्मा अथवा वरदानी माता आहेत.** त्यांच्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला हेच वाटायचे की आपणही दादींच्या सारखे बनावे, त्यांच्यासारखेच आपले संकल्प, बोल व कर्म असावे, त्यांच्यासारखेच आपल्या अलौकिक जीवनातही परिवर्तन करावे.

दादीजींच्या कुशल नेतृत्वाखाली विश्वशांती हेतू अनेक रचनानात्मक कार्यक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर राबविण्यात आले. फलस्वरूप दादीजींना सन १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे 'आंतरराष्ट्रीय शांतीदूत' हा पुरस्कार प्रदान देण्यात आला तसेच ५ राष्ट्रीय स्तरावरील शांतीदूत पुरस्कार देण्यात आले. दादीजींच्याद्वारे करण्यात आलेल्या आध्यात्मिक नैतिक मूल्य शिक्षणाचा विकास लक्षात घेऊन, मोहनलाल सुखाडिया विश्व विद्यालय उदयपूर द्वारे दादीजींना डॉक्टरेटची पदवी बहाल करण्यात आली. त्यांच्या कारकिर्दीतच ज्ञानसरोवर, शांतिवन, ग्लोबल हॉस्पिटल, पीस पार्क असे अनेक प्रोजेक्ट अगदी थोड्या कालावधीत पूर्ण होऊन कार्यान्वित झाले.

**अशा अथक सेवाधारी, वात्सल्यमूर्ती, त्याग-तपस्या-सेवेची मूर्ती, बापसमान संपन्न व संपूर्ण, आदरणीय दादीजींना त्यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त विश्वभरातील आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम!**

**दादीजींच्या स्मृतीस करू या**
**सारे वंदन ।**
**विश्वसेवेसाठी झिजले,**
**जणू हे चंदन ।।**

**- ब्रह्माकुमार शिवाजी.**

# रक्षाबंधनाचे पावन पर्व

ब्र.कु. गोदावरी दीदी, मुलुंड

**दरवर्षी श्रावणी पौर्णिमेला अथवा नारळी पौर्णिमेला हा सण मोठ्या आनंदात भारतात साजरा केला जातो. या सणाची एक विशेषता अशी आहे की ब्राह्मण देखील यजमानाला राखी बांधतो आणि बहीण सुद्धा आपल्या भावाला राखी बांधते. अशाप्रकारे या सणात बहीण व ब्राह्मणाला समानता देण्यात आली आहे.**

रक्षाबंधनाचा सण हा भाऊ बहिणीच्या पवित्र संबंधाचा सर्वोच्च सण आहे. दरवर्षी श्रावणी पौर्णिमेला अथवा नारळी पौर्णिमेला हा सण मोठ्या आनंदात भारतात साजरा केला जातो. या सणाची एक विशेषता अशी आहे की ब्राह्मण देखील यजमानाला राखी बांधतो आणि बहीण सुद्धा आपल्या भावाला राखी बांधते. अशा प्रकारे या सणात बहीण व ब्राह्मणाला समानता देण्यात आली आहे. याला कारण म्हणजे ब्राह्मण हे सनातन धर्माचे प्रतिनिधी मानले जात होते व ते केवळ धार्मिक कार्यांचेच आयोजन करीत. त्यामुळे बहिणीच्याद्वारे भावाला राखी बांधायच्या परंपरेत देखील कुठलेतरी धार्मिक प्रयोजन नक्कीच आहे. वास्तविक पवित्रतेची धारणा करण्याच्या विधी-विधानाला धर्म असे म्हटले जाते. त्यामुळे बहिणीद्वारे भावाला राखी बांधण्यातील धार्मिक प्रयोजन प्रारंभी प्रवित्रतेची धारणा करण्याचे सूचक असेच होते. परंतु काळाच्या प्रवाहात हे रहस्य लोप पावले व आज त्याला केवळ एक परंपरेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्या दिवशी बहीण आपल्या भावाला राखी बांधते व भावाकडे रक्षणाची अपेक्षा करते. रक्षाबंधनाचे गूढ रहस्य जाणण्यासाठी प्रथम हे समजण्याची आवश्यकता



आहे की माणसाची सर्व प्रकारची रक्षा कशी व कोणाद्वारे होऊ शकते? तसेच बहिणी आपल्या भावाकडून कुठल्या प्रकारची रक्षा अपेक्षित करतात? **थोडा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की बहिणी प्रामुख्याने ५ प्रकारची रक्षा अपेक्षित करतात.**

**१) शरीराची रक्षा २) पवित्रता व सतीत्वाची रक्षा ३) काळाच्या पंजातून रक्षा ४) सांसारिक आपत्तीतून रक्षा ५) मायेच्या बंधनातून रक्षा.** परंतु प्रश्न असा आहे की, कुठलाही मनुष्य अशा प्रकारची रक्षा करण्यासाठी समर्थ आहे का?

**१. शरीराची रक्षा :**

शरीराची रक्षा करण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न केले जातात, परंतु शेवटी हेच म्हणावे लागते की ज्याची मृत्युची वेळ आली त्याला कोणीही वाचवू शकत नाही. अर्थात भावी अटळ आहे.

**२. पवित्रता आणि सतीत्वाची रक्षा :** कित्येकांचे असे म्हणणे आहे की, मुसलमानांचे राज्य भारतावर असताना बहीण भावाला यासाठी राखी बांधत असे, की जर एखाद्या मुसलमानाने तिच्या सतीत्वावर आक्रमण केले तर भावाने तिची रक्षा करावी. परंतु मनुष्य तर सर्वसमर्थ नाही. त्यामुळे बहिणीची लाज लुटण्याचे अनेक प्रकार त्याकाळी घडले. खरं तर सतीत्वाची वा पवित्रतेची रक्षा करण्यासाठी सर्वसमर्थ एक परमात्माच आहे. याविषयी महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरणाचे आख्यान प्रसिद्ध आहे. इतिहास साक्षी आहे, जेव्हा कौरवांनी भर सभेत द्रौपदीचे वस्त्रहरण केले, तेव्हा सभेत उपस्थित असलेल्या कोणीच तिला वाचविले नाही. शेवटी तिने परमेश्वराला हाक मारली, तेव्हा तिच्या सतीत्वाची वा पवित्रतेची रक्षा परमेश्वराने केली. त्यामुळेच दुःखाच्या प्रसंगी प्रत्येक

मनुष्याच्या तोंडून हेच उद्‌गार बाहेर पडतात- ''हे प्रभु, मला या दुःखातून मुक्त कर.''

**३. काळाच्या पंजातून रक्षा :** प्रत्येक मनुष्याचे जीवन हे काळाच्या अधीन आहे. त्यात कोणीही अपवाद नाही. सिकंदराचे उदाहरण आपल्या समोर आहे. त्याने अनेक सैनिकांना, मोठमोठ्या योध्द्यांना ठार केले. परंतु तो स्वतःला काळाच्या पंजातून सोडवू शकला नाही. वास्तविक काळाच्या पंजातून सोडविणारा एक परमात्माच आहे. म्हणूनच त्याला 'महाकाळ', महाकालेश्वर (शिव), अमरनाथ अथवा प्राणनाथ असे संबोधिले जाते. त्यामुळे काळापासून वाचण्यासाठी भक्तगण 'मृत्युंजयाचा पाठ' करतात. याचेच गायन आहे- 'जिसको राखे साइयाँ, मार सके ना कोय ।'

**४. सांसारिक आपत्तीतून सुटकाः** कोणीही मनुष्य सांसारिक आपत्तीतून अथवा दुःखापासून सदा काळासाठी रक्षा करू शकत नाही. हे कार्य केवळ एक परमात्माच करू शकतो. म्हणूनच त्याला 'दुःखहर्ता', 'सुखकर्ता', 'संकटमोचन', 'विघ्नविनायक' म्हटले जाते. तोच दुःख वा संकट हरणारा असल्याने त्याला 'हरि' असे संबोधले जाते. तसेच प्रकृती ही त्याची दासी असल्याने, त्याच्या केवळ इशाऱ्याने कुठल्याही प्राकृतिक आपत्तीपासून आपली रक्षा होते.

**५. मायेच्या बंधनातून रक्षा**

परमात्माच मनुष्य आत्म्यांना मायेच्या बंधनातून मुक्त करू शकतो. म्हणूनच प्रत्येकजण त्याला पुकारत असतो -

'विषय विकार मिटावो, पाप हरो देवा', यासंबंधी हत्ती (गज) व मगर (ग्राह) यांची कहाणी प्रसिद्ध आहे. या प्रसंगात देखील हत्तीला परमात्म्यानेच मगरीच्या तावडीतून सोडविले. वास्तविक या कथेत पुढील भाव दडलेला आहे. या कथेत ज्ञानी मनुष्याला हत्तीची उपमा दिली आहे व मायेला (अर्थात पाच विकारांना) मगरीची उपमा दिली आहे. हा संसार एक सागर आहे व कमलपुष्प हे पवित्र जीवनाचे सूचक आहे. त्यामुळे या आख्यानाचा भाव असा आहे की, ज्ञानवान मनुष्यांची मायारूपी मगरीपासून रक्षा, परमात्माच करतो कारण ते परमात्म्याच्या आज्ञेनुसार कमलपुष्पासमान पवित्र जीवन जगतात.

साहजिकच आता आपल्या मनात हा प्रश्न उपस्थित होईल की जर परमात्माच सर्वसमर्थ रक्षक आहे तर बहिणी दरवर्षी भावाला राखी का बांधतात किंवा ब्राह्मण यजमानाला रक्षाबंधन का करतात? **याचे वास्तविक कारण असे आहे की, आपल्या प्रत्येक बहिणीची हीच अपेक्षा असते की माझ्या भावाने पवित्रतेचे व्रत पाळावे. अर्थात आपल्या मन, वचन आणि कर्माने पवित्र राहून, सर्व नारींबरोबर आपल्या बहिणीप्रमाणे व्यवहार करावा. ब्राह्मणांच्याद्वारे रक्षाबंधनाचा उद्देश देखील हाच आहे.** परंतु आज या रहस्याचा विसर पडला आहे. परिणामतः रक्षाबंधनाचे हे पर्व केवळ एक रीति-रिवाज अथवा परंपरा म्हणून साजरे केले जात आहे. वास्तविक रक्षाबंधन पर्व हे आपल्या जीवनातील अपवित्रता रूपी विष दूर करून, पवित्रतारूपी पुण्याचा ठेवा संचित करण्यासाठी दृढ प्रतिज्ञा करण्याचे पर्व आहे. म्हणूनच याला 'विष तोडक' अथवा 'पुण्यप्रदायक' पर्व म्हटले जाते. हे रहस्य जाणून प्रत्येकाने 'पवित्रतेचे पावन रक्षासूत्र' आपल्या हाती बांधावे.

**पुराणातील कथा काय दर्शवितात ?**

पुराणात अशी एक कथा आहे की, असूरांपासून पराजित झाल्याने इंद्राने आपले राज्य गमावले. त्यावेळी इंद्राणीने (इंद्राच्या पत्नीने) इंद्राला राखी बांधली होती. फलस्वरूप इंद्राला गमावलेले स्वर्गाचे राज्य पुन्हा प्राप्त झाले होते. या कथेचा भावार्थ नीट समजण्यासाठी आपल्याला सृष्टिचक्राचे ज्ञान जाणणे आवश्यक आहे. सृष्टिचक्राच्या पहिल्या दोन युगात (सत्य व त्रेतायुगात) सर्व मनुष्यात्मे आत्मअभिमानी असल्याने संपूर्ण पवित्र (निर्विकारी) होते. त्यांच्यात काम-क्रोधादि विकारांचा अंशही नव्हता. त्यामुळे त्यांना स्वर्गाचे सुख वा साम्राज्य प्राप्त होते. तसेच ते दैवी गुण संपन्न असल्याने त्यांना देवी-देवता असे म्हटले जात होते. त्यानंतर द्वापरयुगात देवी-देवता वाममार्गात गेल्या अर्थात देहाभिमानामुळे त्यांच्यात विकारांची प्रवेशता आली. या काम-क्रोधादि विकारांशी (अर्थात असुरांशी) पराभूत झाल्याने त्यांना आपले स्वर्गाचे राज्य गमवावे लागले. **आता कलियुगाच्या अंती संगमयुगात परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माद्वारे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोग शिकवून, पतितांना पावन अथवा शुद्रांना ब्राह्मण बनवितात. संगमयुगात ते पवित्रतेची राखी बांधतात. फलस्वरूप त्यांना पुन्हा देवपदाची प्राप्ती होते आणि गमावलेले स्वर्गाचे राज्य त्यांना पुन्हा प्राप्त होते.**

दुसरी एक कथा आहे की, यमाने देखील आपली बहीण यमुना हिच्याकडून राखी बांधली होती. त्यावेळी त्याने

आपल्या बहिणीला वचन दिले होते की, अशा प्रकारे राखी बांधणारा मनुष्य हा यम-यातनांपासून मुक्त होईल. वास्तविक संगमयुगात परमात्मा, मनुष्य आत्म्यांना जी पवित्रतेती राखी बांधतात त्याद्वारेच मनुष्य यम-यातनांपासून मुक्त होतो. म्हणूनच परमात्म्याला मुक्ती व जीवनमुक्ती दाता असे म्हटले जाते. त्यामुळे वर्तमान संगमयुगात प्रत्येकाने पावित्रतेची राखी अवश्य बांधावी. याची महिमा अपरंपार आहे. त्याविषयी एका कवीने म्हटले आहे.

**रक्षा करण्या पवित्रतेची, राखी करी बांधिशी ।**
**पवित्रतेच्या महामंत्राने, तू इंद्र पदा पोचशी ।**
**सर्व सुखे मिळती तुजला, दृढ निश्चय करिता ।**
**जसा पिता तसेच आपण, स्मृती ठेवी तू आता ।।**

## नराला श्री नारायण व नारीला श्री लक्ष्मी बनविणारी पवित्रतेची राखी

राखी बांधणे हा केवळ एक उपचार नसून, राखी महान परिवर्तन घडविणारे ईश्वरीय जादूचे कंगन आहे. पवित्रतेची धारणा केल्यानेच मनुष्य देवी-देवतातुल्य बनतो. याचेच प्रतीक म्हणून रक्षाबंधनानंतर श्रावण वद्य अष्टमीला गोकुळाष्टमीचा सण भारतात दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. याचे आध्यात्मिक रहस्य देखील हेच आहे की, संगमयुगात पवित्रतेची राखी जे बांधतात अर्थात आपल्या जीवनात पवित्रतेची धारणा करतात, तेच सत्ययुगात श्रीकृष्णासमवेत देवी-देवता पदाची प्राप्ती करतात. तात्पर्य म्हणजे पवित्रता हीच सर्वश्रेष्ठ धारणा अथवा धर्म आहे. त्यामुळेच गीता ज्ञानदाता, परमात्मा शिव पित्याचा सर्व आत्म्यांना हाच संदेश आहे. 'पवित्र बना-योगी बना' याद्वारेच नरापासून श्री नारायण व नारीपासून श्रीलक्ष्मी पदाची प्राप्ती होते. याचेच शास्त्रातून गायन केले जावे-

**'नर ऐसी करनी करे, जो नर से नारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारी से श्रीलक्ष्मी बने ।।'**

त्यामुळे सदैव हे लक्षात ठेवा की, पवित्रता केवळ सुख-शांतीची जननी नाही, तर ती स्वर्गीय सुखाचा वारसा प्राप्त करून देणारी, संपूर्ण कल्पाकरीता श्रेष्ठतम भाग्य प्रदान करणारी, प्रभुप्रितीची निशाणी आहे.

## रक्षाबंधनाची अलौकिक विधी

राखी बांधताना प्रथम बहीण भावाच्या कपाळी चंदनाचा तिलक अवश्य लावते. अशाप्रकारे कपाळावर तिलक लावणे हे आत्मिक स्मृतीत टिकण्याचे प्रतीक आहे. आत्मिक स्मृतीच परिवर्तनाचा आधार आहे. मी शरीर नसून आत्मा आहे, ही स्मृती मनुष्याला हिरेतुल्य बनवते. कारण स्वतःला आत्मा समजल्याने, आत्म्याचा पिता जो शिव परमात्मा आहे, त्याची स्मृती जागृत होते. तसेच परमात्म्याला सर्वाधिक प्रिय कुठली वस्तू असेल तर ती आहे पवित्रता. त्यामुळे पवित्रतेची राखी बांधून बहीण ही जणू आपल्याला पवित्रतेची पालना करण्याची दिव्य प्रेरणा देत असते. त्यानंतर बहीण भावाला मिठाई खाऊ घालून, त्याचे तोंड गोड करते. कारण परमात्म्याचे प्रेम अतिशय मधुर आहे. त्यामुळे भूतकाळातील सर्व कटुता सहजच विसरता येते व आपले जीवन मधुरता संपन्न बनते. **म्हणूनच प्रिय बंधुंनो, रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर पवित्रतेची राखी अवश्य बांधा व आपले जीवन धन्य-धन्य बनवा, हीच मंगलकामना !**

पान क्र. ३ वरून

देवता बनणाऱ्या व्यक्तीला ईशाऱ्याची भाषा समजते. विस्ताराने समजावण्याची आवश्यकता नाही. मुख्य म्हणजे सर्वकाही सोडून आतून संन्यस्त वृत्ती हवी. सर्वात मोठे संन्यासी आपण आहोत. सर्व दुनियाच सोडून जात आहोत, या दुनियेशी आपली जरासुद्धा प्रीत नाही.

६) **आपली भावना खरी हवी - स्नेहपूर्ण हवी.**

**जेव्हा सच्चाईची भावना असते तेव्हा समोरच्या व्यक्तीला सांगितलेले पटते. स्नेहाशिवाय बोललेले शब्द मनाला बोचतात.** आपला प्रत्येक आत्म्याशी स्नेह हवा. कल्याणाची भावना हवी. बाबा इतके आपल्याला प्रेम देतात की त्यामुळे आपण श्रेष्ठ बनवून दाखवू. इतरांसाठी उदाहरण बनू !

**(भावानुवाद : ब्र. कु. मीनाक्षी बहेन, ठाणे (पू.)**



# जीवनात खुशी कशी प्राप्त कराल ?

ब्र. कु. शिवानी बहेन, (गुडगांव)

खुशीचा आधार आपलेच संकल्प असतात, जे आपणच निर्माण करतो. आतापर्यंत आपण समजत होतो की आपल्याला मिळणारी खुशी ही दुसऱ्यावर अवलंबून असते; परंतु आता लक्षात आले की खुशी ही आपल्याच संकल्पावर अवलंबून आहे. त्यामुळे आपले संकल्प अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. दिवसभरात आपण जे जे संकल्प करतो, त्यानुसार आपले व्यक्तिमत्व बनत जाते, त्यातूनच आपले भाग्य निर्माण होते. त्यामुळे आपले लक्ष स्वतःवर केंद्रित असले पाहिजे. बाहेरचे दृश्य वा परिस्थिती काही का असेना, जर आपण त्यावेळी शक्तिशाली संकल्प करू शकलो तर आपल्यामध्ये त्या दृश्याला किंवा परिस्थितीला पार करण्याची क्षमता येईल.

कधी घरी परिस्थिती बिघडलेली असते, संबंधांमध्ये कधी स्वभाव- संस्कारांचा संघर्ष होत असतो, ऑफिसमध्ये कधी मनाविरुद्ध चाललेले असते, अशावेळी जर आपण सकारात्मक संकल्प निर्माण करण्यास सक्षम असू, तर प्रतिकूल परिस्थितीही सहज पार करू शकू. एवढंच नव्हे तर परिस्थितीही बदलू शकू. कारण परिस्थितीही आपल्याच संकल्पाने बनते व बदलतेही. त्यासाठी आपण दुसऱ्यांना दोष देण्याचा स्वभाव बंद केला पाहिजे. त्याच्यामुळे असे झाले, हा स्वभाव बंद केला पाहिजे व अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे की आता मला कोणता विचार केला पाहिजे. त्याची गुणवत्ता कशी असली पाहिजे. अशाप्रकारे आपण जेव्हा जागृत वा सजग होतो तेव्हा परिस्थितीला बदलता येते. फलस्वरूप सदैव खुशीत राहू शकतो.

**दिवसभरातील सूचनांचा मनावर होणारा परिणाम-**

आपण आपल्या प्रत्येक पावलागणिक भाग्य बनवित असतो. त्याचे पहिले साधन आहे, सूचना. आपल्या मनाला ज्या सूचना आपण पोचवितो, प्रामुख्याने त्याच्या आधारे संकल्प उत्पन्न होतात. **त्यामुळे सकाळी उठल्याबरोबर आणि झोपण्याच्या आधी ज्या सूचना आपण मनाला देतो, त्याबाबतीत विशेष सावध असले पाहिजे. यासाठी आपल्याजवळ असे विशेष, सुंदर साहित्य असले पाहिजे, जे आपण झोपण्यापूर्वी व सकाळी उठल्यावर वाचू शकू.** प्रामुख्याने हे लक्षात घेतले पाहिजे की सकाळी उठल्यानंतर तसेच झोपण्याच्या अगोदर काही चांगले साहित्य वाचले पाहिजे ज्यामुळे आपले विचार श्रेष्ठ व सकारात्मक बनतील. एक तर बरेच जण टी.व्ही पाहून झोपतात तसेच काही जण वाचतात परंतु ते चांगले असतेच असे नाही. त्यामुळे मन उत्तेजित होते. अशा परिस्थितीत ते झोपण्याचा प्रयत्न करतात. तथापि त्यांचे चेतन मन शांत नसल्याने, दिवसभरातील घटना किंवा काही कारणांनी झालेला त्रास याविषयी पुन्हा पुन्हा विचार येत राहतात. त्यामुळे अशा व्यक्तीला रात्री झोप येऊ शकत नाही. तो तेव्हा एखादी झोपेची गोळी वा औषध घेतो तेव्हा त्याचे चेतन मन 'शांत' होते व त्याला 'झोप' लागते. यापेक्षा झोपण्यापूर्वी जर आपण चांगले साहित्य वाचले तर विचारांची गुणवत्ता (Quality) बदलत जाते व मन हळू-हळू शांत होत जाते. **त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी टी.व्ही. बघू नये व सकाळी उठल्यावर पेपर वाचू नये. कारण पेपरात नकारात्मक बातम्याच जास्त असतात.**

ब्रह्माकुमारी संस्थेत रोज सकाळी ज्ञानमुरली (परमात्म्याची महावाक्ये) वाचली जातात. त्यामुळे दिवसभर मनाची स्थिती श्रेष्ठ व सकारात्मक असते. तसेच झोपण्यापूर्वी किमान १५ मिनिटे परमात्मा शिव पित्याची आठवण केली जाते. वाचकांनी देखील आपल्या दिनचर्येनुसार शक्य असेल, ते अवश्य करावे.

**मागील अनुभवांचा मनावरील प्रभाव-**

दुसरी महत्त्वाची गोष्ट जिचा आपल्या जीवनावर खोलवर प्रभाव पडतो, ती म्हणजे

**संकल्प अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. दिवसभरात आपण जे जे संकल्प करतो, त्यानुसार आपले व्यक्तिमत्व बनत जाते, त्यातूनच आपले भाग्य निर्माण होते. त्यामुळे आपले लक्ष स्वतःवर केंद्रित असले पाहिजे. बाहेरचे दृश्य वा परिस्थिती काही का असेना, जर आपण त्यावेळी शक्तिशाली संकल्प करू शकलो तर आपल्यामध्ये त्या दृश्याला किंवा परिस्थितीला पार करण्याची क्षमता येईल.**

आपल्या जीवनात घडून गेलेल्या घटनांचे अनुभव. मागच्या वेळी एखाद्या व्यक्तीला भेटल्यावर जो अनुभव आपल्याला आला होता, त्याचीच पुनरावृत्ती ती व्यक्ती परत भेटल्यावर देखील होते. याला कारण म्हणजे तीच विचारचक्रे फिरू लागतात. त्याबाबतीत आपण असे करू शकतो की मागील अनुभवाला वेळीच मनातून काढून टाका व त्या परिस्थितीला समजून घ्या. परिणामतः पुढच्या प्रसंगी ती व्यक्ती भेटल्यावर मागील अनुभवाचा परिणाम होणार नाही. बऱ्याच वेळा आपण मागील अनुभव लक्षात घेऊन, त्यानुसार वागत असतो. आपण म्हणतो देखील की मागच्याही वेळी असंच झालं होतं, मग आताही तसंच वागणार ना? परंतु लक्षात ठेवा, परिस्थिती बदलली की माणसाचे विचारही बदलतात. त्यामुळे एखादी व्यक्ती आधी जशी वागली होती तशीच ती पुन्हा वागेल असे नाही. आपला दृष्टिकोन जर सकारात्मक ठेवला तर त्या व्यक्तीतही सकारात्मक बदल घडू शकतो.

**आपल्या मान्यतांचा मनावर होणारा परिणाम -**

**आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या संकल्पांवर तीन गोष्टींचा प्रभाव पडतो.**

**१) सूचना २) मागचे अनुभव ३) आपल्या मान्यता, विश्वास वा श्रद्धा, या तिन्हीपैकी आपल्या मान्यता, विश्वास वा श्रद्धा यांचे महत्त्व सर्वाधिक आहे.** सूचनांच्या बाबतीत आपण लक्ष ठेऊ शकतो की, काय मनात घ्यायचे आणि काय नाही. तसेच जो अनुभव येऊन गेलेला असतो त्याबाबतीत देखील थोडे लक्ष दिले तर तेही ठीक होऊन जाते. परंतु श्रद्धा मात्र खूप खोलवर रुजलेल्या असतात. त्यांना बदलणे बऱ्याच जणांना अवघड जाते.

आपल्या मान्यता वा श्रद्धा बनण्यासाठी त्या वेळचे वातावरण तसेच आपल्याला लहानपणापासून जे शिकविले गेले, ते बहुतांशी कारण असते. उदा. लहानपणी जेव्हा आपल्या हातून काही चूक होते तेव्हा आई-वडील आपल्यावर रागवतात. अशा घटनांवरून आपली मान्यता झाली की एखाद्याला सुधारण्याचा मार्ग म्हणजे त्याला रागावणे. दुसरी मान्यता अशी की, आजकालच्या जगात ताणतणाव , टेन्शन, डिप्रेशन अगदी स्वाभाविक आहे; मग आपण खुश राहणार कसे? अशा प्रकारच्या अनेक चुकीच्या मान्यतेमुळे आपल्या मनाची 'ऑपरेटिंग सिस्टीम' (कार्यप्रणाली) बिघडवून टाकली आहे. त्यामुळे आपली मान्यतांची विधी (बिलीफ सिस्टीम) चेक करा, कारण आपली मान्यता जर चुकीची असेल तर त्याचा परिणाम आपल्या भाग्यावर होईल. आपली जशी मान्यता तसे संकल्प निर्माण होतात आणि संकल्पाने भाग्य बनत असते.

मी परिवारासाठी एवढे केले, संपूर्ण जीवन दिले आणि त्यांनी माझ्यासाठी काय केलं? ही मान्यता बदलली पाहिजे. कारण त्यांनी जर आपल्या अपेक्षेप्रमाणे केले नाही तर आपल्याला दुःख होईल. त्यामुळे लक्षात ठेवा की प्रत्येकाचा स्वभाव वेगळा आहे, प्रत्येकाची क्षमता वेगळी आहे, परिस्थिती देखील भिन्न आहे त्यामुळे आपण जसे दुसऱ्यांशी वागलो तसेच ते आपल्यासाठी वागतील असे नाही. म्हणून आपण आपली मान्यता बदलायला हवी व ही मान्यता मनात ठेवायला हवी की मला खुशी मिळते म्हणून मी दुसऱ्यांशी चांगले वागतो. त्यामुळे सहाजिकच आपण दुसऱ्याकडून काही अपेक्षा ठेवणार नाही. दुसऱ्याचे वागणे कसेही असो; परंतु आपला विचार ही आपलीच रचना आहे, याकडे सदैव लक्ष दिले पाहिजे.

तसेच हे लक्षात ठेवा की, विचाराने भावना (संवेदना), भावनेमुळे कर्म, कर्मामुळे सवय बनत जाते. आता प्रश्न असा पडतो की, एखादी वाईट सवय का बनते? कारण आपण कधीही थांबून आपल्या संकल्पांचे निरीक्षण करत नाही किंवा त्यांना बदलत नाही त्यामुळे आपल्या मनाशी हे नक्की करा की मी रोज सकाळची १५ मिनिटे व झोपण्यापूर्वीची १५ मिनिटे स्वतःसोबत घालवीन. स्वतःचे आत्मपरीक्षण करीन, त्यामुळे आपली सतत उन्नती होत राहील अन्यथा आपण पूर्वीसारखेच साधारण जीवन जगत राहू.

**सकारात्मक संकल्पाने प्राप्त परिस्थितीत परिवर्तन-**

आपले प्रत्येकाचे लक्ष्य हे असले पाहिजे की मला अशा प्रकारचे संकल्प निर्माण करायचे की ज्यातून माझे भाग्य श्रेष्ठ बनेल. परंतु होतं काय? आपण त्या परिस्थितीला नकारात्मक विचारांचे खतपाणी घालतो. (वारंवार चिंतन करून) त्यामुळे ती परिस्थिती अथवा समस्या मोठी वाटायला लागते. समजा तुमच्या जीवनात एक समस्या आहे. कल्पना करा, तिचे प्रमाण ५०%आहे. नंतर तुम्ही जर विचार करत बसलात की माझे भाग्यच खराब आहे, मला आता साडेसाती चालू आहे, देवाने माझ्या वाट्यालाच हे सारं का दिलं? असे विचार करून तुमची समस्या ५०% वरून ६०%, ६०% वरुन ७०% अशी वाढत जाईल. याऐवजी जर तुम्ही सकारात्मक संकल्प करत गेलात की मी लवकरच या समस्येतून मुक्त होईल, मी शक्तिशाली आत्मा आहे, स्वयं भगवान माझा साथी आहे... अशा विचाराने तुमची समस्या ५०% वरुन ४०%, ४०% वरुन

पान क्र. १२ वर



खास स्वतंत्रता दिनानिमित्त....

# आकाशी झेप घे रे [आत्मारूपी] पाखरा, सोडी [देहरूपी] सोन्याचा पिंजरा...

**ब्र.कु. हेमंतभाई,** शांतिवन (आबू रोड)

**१५ ऑगस्ट १९४७ हा स्वातंत्र्याचे सुख व स्वाद चाखविणारा स्वर्णिम दिवस! आम्हा भारतीयांना स्वराज्याचा गोडवा अन् गारवा देणारा महान दिवस. क्रूर इंग्रजांच्या अत्याचारी शासनाचा अंत व मुक्तीचा अफाट आनंद देणारा शुभ दिनच! म्हणूनच दरवर्षी ह्या पावन दिनी अवघा भारत देशप्रेमात न्हाऊन निघतो.** गल्लीबोळातून देशभक्तीपर गीतांच्या स्वरलहरी गुंजू लागतात. मग डोळ्यांसमोर उभे ठाकतात; मातृभूमीला गुलामीतून सोडविणारे वीर सुपुत्र ज्यांनी देशधर्मासाठी प्राण पणाला लावले. ह्या मंगलदिनी त्या असंख्य शूर वीरांना स्मरून सलामीही दिली जाते.

परकीयांच्या गुलामीतून सुटून आता भारताला सत्तर वर्षे झाली आहेत. आज प्रत्येक भारतीय मोकळ्या मनाने श्वास घेत आहे तसेच स्वातंत्र्याचा पुरेपूर आनंद घेत आहे. प्रत्येकाला भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, कोठेही हिंडण्या-फिरण्याचे स्वातंत्र्य आहे. भारताच्या पाठीवर अनेक धर्म, जाती, पंथ, संप्रदाय तसेच अनेक भाषिक लोक नांदत आहेत. विविधतेत एकतेचे हे दृष्य किती सुंदर विलोभनीय दिसत आहे, परंतु याला आज जणू ग्रहण लागले आहे. भारतात वरचेवर होणाऱ्या अतिरेकी कारवाया, जातीय दंगे, महिलांवर होणारे अत्याचार, पापाचार, हिंसाचार, भ्रष्टाचार या सर्व गोष्टींना पाहून मनात प्रश्न उपस्थित होतो की, आम्ही स्वातंत्र्य मिळवून खरेच सुखी झालो आहोत का? आजही आपण आनंदाच्या आकाशी मुक्तपक्षी बनून भराऱ्या मारतोय का? छे! छे! वर-वर दिसायला आम्ही स्वतंत्र झालो आहोत. आभास होतोय गगनी उंच उडायचा; परंतु पाय मात्र जमिनीतच अडकलेत. आजही आपल्या कृषिप्रधान देशात हजारो शेतकरी जीवघात करीत आहेत.

**स्वतंत्रता म्हणजे काय?**

स्वतंत्रता अर्थात स्वतःचे तंत्र अर्थात शासन. स्व अर्थात आत्मा. आत्मिक गुणांनी युक्त व दुर्गुणांपासून मुक्त होऊन स्वतःवर व इतरांवर आत्म्याचे शासन असणे. प्रत्येकाला, खरे आत्मिक सुख प्राप्त करण्यासाठी मोकळीक असणे. स्वरूपात (स्वमानात स्थित होऊन) दुसऱ्यावर स्नेहयुक्त शासन करणे, म्हणजे खरी स्वतंत्रता. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला आनंदमय जीवन तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा देशवासियांना स्वतंत्रता म्हणजे काय, हे खऱ्या अर्थाने समजेल. **स्वतंत्रता म्हणजे स्वैराचार नव्हे तर सर्वांच्या कल्याणासाठी बनविण्यात आलेले कायदे मनापासून पाळणे. तसेच उगीचच भांडण तंटे न करता, मिळून मिसळून वागणे. आधी दुसऱ्याचे दुःख दूर करून नंतरच स्वतःच्या सुखाचा विचार करणे. आपल्यावर असलेल्या समाज ऋणाची जाणीव ठेवून, त्याची परतफेड करण्याचा प्रयत्न करणे.**

आनंदाच्या आकाशी उंच भरारी घ्यावीशी वाटत असेल तर खरे स्वातंत्र्य (स्वतःचे स्वतःवर शासन) हवे. परकीयांचे शासन नसणे व स्वकीयांच्या हाती सत्ता असणे, म्हणजे स्वराज्य नव्हे, **जेव्हा मानव विषय-वासना जनित इंद्रिय सुखांना तिलांजली देतो, चांगले वाईट जाणून मर्यादांचे पालन करतो, आत्मा राजा बनून आपल्या कर्मेंद्रियांवर राज्य करतो; ती खरी स्वतंत्रता होय.**

**देह हा आत्मारूपी पक्षाचा पिंजरा -**

**तसे पाहिले तर देह हे प्रत्येक आत्म्याचे सुख पूर्तीचे साधन आहे. सुखयुक्त व दुखःमुक्त आनंदमय असे जीवन हेच मानवाच्या कर्मरूपी साधनेचे वास्तविक साध्य आहे. हे साध्य केवळ पवित्रतेच्या बळानेच साधले जाऊ शकते कारण पवित्रताच सुखशांतीची जननी आहे.** पवित्रता हा आत्म्याचा स्वधर्म आहे. त्यामुळे आत्मअभिमानी बनून केलेले प्रत्येक कर्म हे सुख-शांती प्रदान करते. याउलट देहअभिमानामुळे पाच विकारांची उत्पत्ती होते, ज्यातून मनुष्याला दुःख-अशांती प्राप्त होते. जसा पिंजऱ्यातील पक्षी हा आकाशात स्वच्छंदपणे विहार करू शकत नाही, त्यामुळे तो दुःखी असतो. तसाच कलियुगात आत्मारूपी पक्षी देहअभिमानाच्या पिंजऱ्यात बंदिस्त असल्याने दुःखी आहे. रात्रंदिवस तो भय,

चिंता, टेंशन, डिप्रेशन यांचा अनुभव करीत आहे म्हणूनच परमार्थाच्या पथावर वाटचाल करताना देहाच्या या बंधनातून मुक्त होणे, अतिशय महत्त्वाचे आहे. देह, देहाचे संबंधी, वस्तू, वैभव या गोष्टींचे आकर्षण साधकाच्या मन-बुद्धीला बांधून टाकते. त्यामुळे कुठलाही साधक आत्मचिंतन व परमात्म चिंतनात मग्न होऊ शकत नाही. **वास्तविक मन-बुद्धी प्रभुचिंतनात रममाण होणे, परमधामी असलेल्या परमपित्याच्या प्रेमळ आठवणीत रमून जाणे हीच खरी स्वानंदाच्या गगनी, आत्मारूपी पक्ष्याने झेप घेणे होय. हेच खरं स्वातंत्र्य वा स्वराज्य होय.**

एकदा एक गुरू आपल्या शिष्याला बरोबर घेऊन फिरायला निघाले. वाटेत एक गुराखी गायीला गळ्यातील दोराने खेचत चरण्यासाठी नेत होता. हे पाहून शिष्य गुरूला म्हणाला, 'गुरुजी, तो गुराखी पहा, बिचाऱ्या गाईला कसा ओढत घेऊन चाललाय.' तेव्हा गुरू शांततेने उत्तरले, 'नाही बाळा, गुराखी गाईला नेत नाही उलट ती गाय त्या गुराख्याला जंगलात नेत आहे. गुरुजींचा भाव लक्षात न आल्याने शिष्य गोंधळून गेला व म्हणाला, 'नाही गुरुदेव, तो गुराखीच त्या गाईला ओढून नेत आहे'. तेव्हा त्याला समजावित गुरू म्हणाले, 'हे पहा जर गाईने दोर तोडला व ती पळाली तर सांग बरं कुणाच्या मागे कोण धावेल?' शिष्य म्हणाला, 'गुराखी गाईच्या मागे धावेल' त्यावर गुरू म्हणाले, 'हे बघ, वर-वर पाहता गाईला गुराख्याने जरी बांधले असले तरी खरे पाहिले तर गाईनेच गुराख्याला आपल्या बंधनात बांधले आहे. तोच गाईच्या मोहमायाने तिच्या मागे-मागे फिरतोय.'

याप्रमाणेच मनुष्य आत्म्याला देह, देहाचे संबंधी, वस्तू, वैभव यांच्या इंद्रियलोलूप सुखदायी इच्छांनी, बंधनात बांधून ठेवले आहे. त्यामुळे प्रभुचिंतनाच्या वेळी (राजयोगाचा अभ्यास करताना) मन-बुद्धी एकाग्र न होता, जास्त वेळ ती इंद्रियांच्या सुखाकडेच धाव घेत असते. त्यामुळे राजयोगाची ही गहन अनुभूती व्हायला हवी, ती होत नाही. म्हणूनच **योगेश्वर शिवबाबा नेहमी सांगतात. 'इच्छा आपको अच्छा बनने नही देगी ! इसलिए 'इच्छा मात्रम् अविद्या' बनो।' तात्पर्य म्हणजे देह व देहाच्या दुनियेपासून नष्टोमोहा बनून, एक परमात्मा शिव पित्याच्या मधुर स्मृतीत लवलीन होऊन आनंदाच्या आकाशी उंच भरारी घेऊ या. त्यासाठी दैहिक दुनियेच्या आकर्षणाच्या पलीकडे जाऊ या.** अर्थात देहाच्या सोनेरी पिंजऱ्याच्या बंधनातून मुक्त होऊ या. हीच जीवन जगण्याची खरी रीत व प्रेमसागर प्रभु पित्याशी प्रीत होय. हीच खरी आत्मिक स्वतंत्रता होय.

पान क्र. १० वरून

३०% अशी कमी-कमी होत जाऊन, शेवटी समाप्त होईल.

**तात्पर्य म्हणजे प्राप्त परिस्थिती ही वास्तविकता आहे; परंतु तिला जास्ती वा कमी करण्याचा आधार आहे, आपले नकारात्मक वा सकारात्मक विचार. त्यामुळे आज जी वास्तविकता आहे, त्याविषयी विचार न करता, आपल्याला जे व्हायला पाहिजे आहे, त्याविषयी विचार करा. समजा आपल्याला एखादा आजार आहे, ही वास्तविकता आहे. परंतु त्याचा फारसा विचार न करता, आपल्याला जे संपूर्ण स्वास्थ्य आवश्यक आहे, त्याविषयी विचार करा.** ब्रह्माकुमारी संस्थेत योग करताना हेच संकल्प दिले जातात की मी पवित्र आत्मा आहे, शांत स्वरूप आत्मा आहे, सुखस्वरूप आत्मा आहे, आनंद स्वरूप आत्मा आहे- ( असे संकल्प देत नाहीत की मी पवित्र आत्मा बनणार आहे, सुखस्वरूप आत्मा बनणार आहे...)

अशा प्रकारे आपण जेव्हा श्रेष्ठ संकल्प करतो, त्याद्वारे निर्मित ऊर्जेचा परिणाम प्रथम आपल्या मनावर होतो. तसेच त्याचा परिणाम आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीवर होतो. आपण ज्यांच्याविषयी संकल्प करतो, त्यांच्यापर्यंत जातो व नंतर वायुमंडलवर त्याचा परिणाम होतो.

**यावरून आपल्या लक्षात येईल की आज प्रत्येकाच्या मनात जो क्रोध आहे, संबंधात कटुता आहे, स्वास्थ्य ठीक नाही, वातावरणात सर्वत्र प्रदूषण वा अशुद्धी आहे, या सर्व गोष्टी आपल्या नकारात्मक संकल्पांचाच परिणाम आहे. जर आपण आपले संकल्प सकारात्मक केले तर सर्व जगच बदलेल. सर्वत्र शांती व प्रेम दिसेल, सर्वांचे स्वास्थ्य चांगले असेल, सर्वांचे जीवन खुशीने भरपूर असेल, सांप्रत कलियुग जाऊन या सृष्टीवर सत्ययुग येईल. त्यामुळे आपला प्रत्येक संकल्प सकारात्मक असण्याकडे लक्ष द्या.**

(संदर्भ : 'हॅपी लिव्हिंग' हे पुस्तक)

# म्हातारपण अभिशाप नसून, एक वरदान आहे....

**ब्र. कु. भगवानभाई,** शांतिवन (आबू रोड)

समाजामध्ये वयोवृद्ध (जेष्ठ नागरिकांची) संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हल्ली साठीनंतर कोणाला डोळ्यांनी कमी दिसते, तर कोणाला ऐकायला कमी येते, कोणाची स्मरणशक्ती कमी होते, दात किडतात व पडतात, कोणाचे हात, मान थरथरते. अशा तऱ्हेची अनेक शारीरिक व मानसिक वैगुण्ये निर्माण होतात. म्हणूनच म्हातारपणी कित्येकांना असे वाटायला लागते की आता आपण समाजाच्या उपयोगी राहिलो नाही. परिवाराला एक ओझं बनत चाललो आहोत. आता पुढे आपले काय होणार? आपला सांभाळ कोण करणार? ज्यांना मी लहानाचं मोठं केलं, तीच मुलं, नातवंड आता माझा तिरस्कार करायला लागले आहेत. अशा अनेक नकारात्मक विचारांनी त्यांच्या जीवनात तणाव वाढत जातो. त्यातूनच पुढे त्यांना शारीरिक व मानसिक आजारांना सामोरे जावे लागते. परिणामतः त्यांचे शरीर जसे म्हातारे होत जाते तसेच मनसुद्धा म्हातारे होत जाते. आपल्या जीवनात केलेल्या काही चुका, पापकर्म, अन्यायकारी घटना पुन्हा-पुन्हा आठवत राहिल्याने, जीवन निरर्थक वाटू लागते. यातून बाहेर पडण्यासाठी काही लोक नशा करतात, काही डिप्रेशन (नैराश्य) मध्ये जातात, तर काही जीवनाला कंटाळून आत्महत्यासुद्धा करतात. बऱ्याच म्हाताऱ्या लोकांना वाटते की म्हातारपण आपल्यासाठी अभिशाप आहे. परंतु लक्षात ठेवा, म्हातारपण अभिशाप नसून, एक वरदान आहे, कसे ते पाहूया.

**म्हातारपण म्हणजे एक आनंद सोहळा आहे !**

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात तरुण वर्गाला एवढी धावपळ करावी लागते की त्याला स्वतःसाठी वेळच देता येत नाही... तो केवळ यंत्रवत जीवन जगत असतो. त्याच्या जीवनात शांती, प्रेम, आनंद, संबंधाचे सुख... या गोष्टींचा अभाव असतो. आपल्याला खूप मोठं व्हायचं आहे, खूप पैसा कमवायचा आहे, मोठा फ्लॅट खरेदी करायचा आहे, एखादी गाडी खरेदी करायची आहे... अशी अनेक स्वप्ने उराशी बाळगून, त्यामागे तो अहोरात्र धावत असतो. त्यातील काही स्वप्नं पूर्ण करण्यात तो यशस्वी देखील होतो; परंतु जीवनाचा खरा आनंद उपभोगण्यासाठी त्याला मात्र वेळच मिळत नाही. सूर्योदय व सूर्यास्ताचा आनंद, वर्षा ऋतूतील निसर्गाची सुंदरता, निसर्गाशी समरस होऊन स्वस्थ जीवन जगण्याचे सुख, सर्व प्राणीमात्रांवर दया केल्याने मिळणारी मनःशांती, मंदिरांच्या वातावरणातील पवित्रता... या सर्व गोष्टींपासून तो दूर असतो. **त्यामुळे म्हातारपणी जेव्हा नोकरी, धंद्यातून तो मुक्त होतो, त्यावेळी त्याला भरपूर मोकळा वेळ मिळतो, त्याचा प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाने पुरेपूर फायदा घ्यावा व आपल्या उर्वरित आयुष्यात एक आनंद सोहळा उपभोगावा. वास्तविक म्हातारपण म्हणजे तुम्ही या जन्मात जी श्रेष्ठ कर्मे केलीत वा जी पुण्याई जमा केली, त्याचे फळ चाखण्याची ही वेळ आहे.** त्यामुळे आपली मानसिकता सदैव सकारात्मक ठेवा. वर्तमानात खूप आनंदाने जगा. भूतकाळाला पूर्णतः विसरा. (बिंदी लावा) **वर्तमान जीवनात सर्वांना सुख द्या व सुख घ्या. कोणालाही दुःख देऊ नका. तसेच तुम्हाला जर कोणी दुःख दिले, तर ते घेऊ नका. (अर्थात मनाने त्याचा स्वीकार करू नका) आजवर जीवनात पैसा कमविण्याकडे लक्ष दिले, आता पुण्य कमविण्याकडे अधिक लक्ष द्या. त्यासाठी स्वतःला पूर्वज व पूज्य आत्मा समजा.**

सदैव लक्षात ठेवा की आपण एक आत्मा आहोत. आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे. तो कधीच मरत नाही किंवा म्हातारासुद्धा होत नाही. खरं तर जीवनरूपी यात्रा करण्यासाठी प्रत्येक आत्मा, परमधामरूपी घरातून या सृष्टीवर आला आहे. त्याचे संबंधी हे त्या यात्रेतील सहप्रवासी आहेत. जसा प्रत्येक सहप्रवासी आपल्या निर्धारित ठिकाणावर पोहचल्यावर, आपल्याला सोडून जातो, **तसाच प्रत्येक आत्मा देखील निर्धारित समयापर्यंत आपल्या संबंधितांना साथ देतो. त्यामुळे या सृष्टीवर अव्याहतपणे चालणाऱ्या या जन्म-मृत्यूच्या खेळाचा आनंद घ्या. कारण जन्म म्हणजे आत्म्याने शरीररूपी नवीन वस्त्र परिधान करणे व मृत्यू म्हणजे जीर्ण वस्त्राचा त्याग करणे.** महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरीररूपी वस्त्र त्यागल्यानंतर आत्म्याला पुन्हा नवीन वस्त्र मिळणारच असते. त्यामुळे मृत्यू ही तर आनंदाची गोष्ट आहे. त्यात दुःख कसले? खरी गंमत तर अशी आहे की या जन्मातील जे आपले संबंधी असतात तेच आपल्या कर्मबंधनाच्या अनुसार आपल्या

**प्रत्येक जेष्ठ नागरिकाने जो मोकळा वेळ मिळतो त्याचा पुरेपुर फायदा घ्यावा व आपल्या उर्वरित आयुष्यात एक आनंद सोहळा उपभोगावा. वास्तविक म्हातारपण म्हणजे तुम्ही या जन्मात जी श्रेष्ठ कर्मे केलीत वा जी पुण्याई जमा केली, त्याचे फळ चाखण्याची ही वेळ आहे. त्यामुळे आपली मानसिकता सदैव सकारात्मक ठेवा. वर्तमानात खूप आनंदाने जगा. भूतकाळाला पूर्णतः विसरा. (बिंदी लावा) वर्तमान जीवनात सर्वांना सुख द्या व सुख घ्या. कोणालाही दुःख देऊ नका.**

पुढील जन्मातही भेटणार असतात. त्यामुळे या अविनाशी सृष्टिनाटकाचा आनंद घ्या. ईश्वरीय ज्ञानानुसार आपण जाणतो की संगमयुगात 'मातेश्वरी मम्मा' ज्या पिताश्री ब्रह्माबाबांच्या अलौकिक पुत्री होत्या. त्याच सत्ययुगात श्रीलक्ष्मी बनणार आहेत व पिताश्री ब्रह्माबाबा हे श्रीनारायण बनणार आहेत. तसेच आपण ब्रह्मावत्स देखील संगमयुगातील आपल्या पुरुषार्थानुसार सत्ययुगात (श्रीलक्ष्मी-श्रीनारायणाच्या राज्यात) पद प्राप्त करणार आहोत. तात्पर्य म्हणजे हे सृष्टिनाटक (ड्रामा) अतिशय कल्याणकारी आहे. **याविषयी ज्ञानसागर शिवबाबांची पुढील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत - '' मोठे बच्चे, यह बहुत मजेका खेल है। खेल हमेशा मजेका ही होता है। सुख भी होता है, तो दुःख भी होता है। इस बेहदके खेल को तुम बच्चे ही जानते हो। इसमे रोने-पीटने आदि की बातही नही है। तुम आत्माएँ इसके एक्टर्स हो। तुम सभी जानते हो कि यह ड्रामा कैसे फिरता है। इसके आदि-मध्य-अन्त का राज भी बाप ही समझाते है।''**

**मन स्वस्थ तर शरीरही स्वस्थ....**

तसे पाहिले तर आयुष्यभर शरीराची झीज झाल्याने, ते म्हातारे होत असते, परंतु मनाची झीज मात्र होत नसते. त्यामुळे म्हातारपणी सुद्धा आपल्या मनाला एखाद्या तरुणाप्रमाणे नेहमी उत्साहात ठेवा. शेवटच्या क्षणापर्यंत हसत-खेळत जगा. एखाद्या प्रौढाप्रमाणे परिपक्व बना. वयानुसार शरीराची कार्यक्षमता कमी झाली तरी मनाची सुखद, कल्पनाशक्ती कमी होऊ देऊ नका. आतापर्यंत जीवनात अनुभवांचा जो खजिना जमा केला आहे, तो दुसऱ्यांना देत राहा. **सेवानिवृत्तीनंतरचे जीवन हे आपल्याला ईश्वराकडून प्राप्त विशेष वरदान समजून, ते सत्कर्माद्वारे पुण्यसंचय करण्यासाठी सफल करा. आपल्या परिवाराचे तसेच समाजाचे कल्याण करण्याच्या सेवेत व्यस्त राहा.** स्वतःचे केस पांढरे झाले म्हणून नकारात्मक विचार करू नका. पांढरे केस हे अनुभवी आत्म्याचे लक्षण आहे, हे विसरू नका. म्हातारपणात धैर्यता व सहनशक्ती धारण करुन जगा. हे दोन गुण तुमच्या मानसिक संतुलनाचा पाया आहे. म्हणूनच म्हटले जाते की ज्याच्याकडे पेशन्स (धैर्यता) आहे, तो कधी पेशन्ट (आजारी) बनत नाही.

कुठल्याही विपरीत परिस्थितीत सकारात्मक विचार करा. आपली मुलं, सुना, नातवंड जशी आहेत तशी स्वीकार करा. ते खूप पैसे उधळतात. मी तर माझ्या आयुष्यात असं कधी केलं नाही. हॉटेलचे तोंड पाहिले नाही, कधी पिक्चर पाहिला नाही. हे सर्वजण माझ्या मेहनतीवर पाणी फिरवत आहेत, असे विचार डोक्यात आणू नका. तुमचा जमाना वेगळा होता, आजचा जमाना वेगळा आहे, त्यामुळे दुसऱ्यांचे व्यर्थ चिंतन करू नका. तुम्ही पुढच्या यात्रेची तयारी करत राहा. तुम्हाला पूर्वायुष्यात पुण्य कमवायला वेळ मिळाला नव्हता, आता तो मिळाला आहे. त्याचा पुरेपूर सदुपयोग करा. म्हणूनच सर्व वयोवृद्धांना माझी विनंती आहे की तुम्ही ब्रह्माकुमारीज्‌च्या सेंटरला जाऊन, सात दिवसांचा राजयोगाचा कोर्स अवश्य करा. त्यात आपल्याला हे ज्ञान प्राप्त होईल की आपण कोण आहोत? कोठून आलो आहोत? आपला आत्मिक पिता कोण आहे? मृत्यूनंतर आपले काय होणार? वर्तमान समय किती महत्त्वपूर्ण आहे? फलस्वरूप तुम्हाला मरणाची भीती वाटणार नाही. कारण कलियुगानंतर आता लवकरच स्वर्गिक दुनिया येणार आहे. अशा या स्वर्गिक दुनियेत जाण्याची उत्सुकता तुम्हाला वाटू लागेल. तेथे जाण्यासाठी आवश्यक पुरुषार्थ करण्यासाठी तुमचे उर्वरीत जीवन सफल होईल. तुमच्या स्वभाव-संस्कारात परिवर्तन घडून आल्याने, तुम्ही श्रेष्ठाचारी बनाल. त्यामुळे तुम्ही सर्वांसमोर उदाहरणमूर्त बनाल. तुमचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटेल. तुम्हाला दीर्घायुष्य तसेच आरोग्य लाभो, हीच शुभभावना व शुभकामना सर्वांकडून मिळत राहील.

**वयोवृद्धांसाठी आनंददायी १६ सूत्रे -**

**आपला वृद्धापकाळ सुखा-समाधानाने जावा, यासाठी खाली नमूद केलेली १६ सूत्रे सदैव लक्षात ठेवा.**

१) नेहमी कमी बोला, हळू बोला आणि सकारात्मक बोला.

२) आपण अर्जित केलेल्या धन-संपत्तीचे वर्णन वारंवार करू नका. आपल्या परिवारातील सदस्यांच्या उन्नतीसाठी तिचा सदुपयोग अवश्य करा. परंतु आपल्या जिवंतपणी सर्व प्रॉपर्टी वारसांना देऊन टाकू नका. (अन्यथा 'नटसम्राट' नाटकासारखी तुमची गत होऊ शकते.)

३) एखादी मनइच्छित वस्तू मिळाली नाही म्हणून रागवू नका.

४) आपला मुलगा, मुलगी तसेच सून यांच्या कार्यव्यवहारात पुन्हा-पुन्हा दखल देऊ नका.

५) घरातील सदस्यांनी मला विचारूनच सर्व कामे करावीत, ही अपेक्षा बाळगू नका.

६) खाण्या-पिण्यामध्ये संतुष्ट राहा. जे मिळेल ते खाऊन, ईश्वराला धन्यवाद द्या.

७) घरातील सर्वांशी प्रेमाने व्यवहार करा. त्याचबरोबर कुणाशी अधिक मोह, ममता सुद्धा ठेवू नका. कारण तुम्हाला या घरातून बाहेर पुढच्या यात्रेसाठी जायचे आहे.

८) म्हातारपणी आपल्या वाट्याला जे दुःख वा कष्ट आले आहेत, ते सर्व आपल्याच कोणत्या ना कोणत्या विकर्माचे फळ आहे, त्याला इतर कोणी दोषी नाही, हे समजून नेहमी शांत राहा.

९) मुला-मुलीचे वा सुनेचे कटूवचन ऐकूनही शांत राहा. त्याला प्रत्युत्तर देऊ नका.

१०) आपल्या तब्बेतीनुसार घरकामात काहीना काही मदत करत राहा.

११) **हे लक्षात ठेवा की आता लवकरच आपण पुढच्या जन्माच्या यात्रेची सुरुवात करणार आहोत. त्यामुळे अधिकाधिक साधना (योगाभ्यास) व सेवा करून, पुण्यसंचय करीत राहा. तरच तुमची यात्रा आनंददायी होईल.**

१२) परिवारातील सदस्यांची कमी-कमजोरी इतरांना सांगत बसू नका. आपल्या जीवनात आपल्या हातून ज्या वाईट गोष्टी घडल्या असतील, त्यादेखील आपल्या पोटातच पचवा.

१३) सदैव लक्षात ठेवा की जे काही घडणार आहे, ते चांगलेच घडणार आहे. परमात्मा शिवपिता सदा आपल्या सोबत आहे. त्यामुळे आपले भविष्य अतिशय चांगले आहे, यावर दृढ विश्वास ठेवा.

१४) आपल्या आरोग्याची काळजी घ्या. त्यासाठी नियमित फिरायला जा. झेपेल असा हलका फुलका व्यायाम करा. आरोग्यदायी आसनांचा अभ्यास करा. कपालभाती, अनुलोम-विलोम व भ्रामरी यांचा रोज किमान १५ मिनिटाकरिता अभ्यास करा.


१५) आपल्या जीवनात जे काही भौतिक रूपाने कमविले आहे, ते तर सोबत येणार नाही. म्हणून पुढील जन्मासाठी पुण्यकर्माची शिदोरी जमा करा.

१६) **सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वर्तमान संगमयुगाला ओळखा. आता स्वयं परमात्मा शिवपिता, आत्मारूपी सर्व मुलांना भविष्य २१ जन्मांसाठी अविनाशी सुख-शांतीचा वारसा देत आहेत. त्यामुळे त्याच्या श्रीमतावर चाला, आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण, प्रत्येक संकल्प, बोल व कर्म सफल करा.** त्याद्वारे भविष्यात तुम्ही पद्मापद्म भाग्यशाली बनाल; अशी ईश्वरीय गॅरंटी आहे. (या समयाचेच गायन आहे देव घ्या कोणी, देव घ्या कोणी, आयता आला घर बसूनी...)

**वरील आनंददायी १६ सूत्रे जर आपण आपल्या जीवनात आणली तर खचीतच आपले म्हातारपण हे वरदान असल्याचा अनुभव येईल. शेवटी सर्वच थोरामोठ्यांची पुढील यात्रा आनंददायी होवो; हीच मंगलकामना !**

# सदैव स्वतःला होलीहंस समजा..

होलीहंस आत्मा अर्थात जो सदैव सत्य व असत्य यांचा निर्णय करू शकतो. जशी हंसाची निर्णय शक्ती तीव्र असते, त्या निर्णय शक्तीच्या आधारे तो खडे व रत्न वेगळे करू शकतो. तो फक्त रत्न तेवढे ग्रहण करतो व खडे सोडून देतो. तशी **होलीहंसाची अर्थात ज्याची निर्णय शक्ती नंबर वन आहे तो निगेटीव्ह (नकारात्मक) गोष्टींना सोडून देतो व पोझिटिव्ह (सकारात्मक) ते धारण करतो. पाहतानाही तो नकारात्मक गोष्टी पाहत नाही. ऐकतानाही नकारात्मक गोष्टी ऐकत नाही. हीच होलीहंस आत्म्याची विशेषता आहे.**



# श्रीकृष्ण जन्माष्टमी

**ब्र.कु. लतिका बहेन,** ठाणे



आपला भारत देश उत्सवप्रिय देश आहे. प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता उत्सव हमखास असतो. त्यात श्रावण महिन्यात तर उत्सवांची पर्वणी असते. श्रावण महिन्याच्या वद्य अष्टमीला श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव संपूर्ण भारतात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरा केला जातो. भारतीयांना श्रीकृष्ण फारच प्रिय आहे. त्याची सत्त्वप्रधान शरीर प्रवृत्ती, हसतमुख प्रसन्न चेहरा सर्वांचे मन आकर्षित करणारा आहे. **श्रीकृष्ण जन्मतःच पूज्य होता. त्यामुळे त्याच्या बाल्यावस्थेच्या चित्रात, त्याच्या चेहऱ्याभोवती प्रकाशाचे वलय व मस्तकी रत्नजडित सुवर्णमुकुट दर्शविण्यात येतो. इतिहासात असा एकही धर्मनेता वा राजनेता नाही की ज्याला हे दोन्ही मुकुट जन्मतःच प्राप्त होते. यामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव हा खरोखरच अद्वितीय असा महोत्सव आहे.**

दुसरी गोष्ट म्हणजे आपण ज्या महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करतो त्यापैकी कोणीही १६ कला संपूर्ण नव्हते. केवळ श्रीकृष्ण हेच १६ कला संपूर्ण देवता होते. श्रीकृष्णामध्ये शारीरिक सुंदरता, आत्मिक बळ, पवित्रता व दिव्य गुणांची पराकाष्ठा होती. त्यामुळे मनुष्य देहात जो सर्वोत्तम जन्म होऊ शकतो, तो त्यांचा होता. म्हणूनच श्रीकृष्णाला राजे पूजतात तसेच महात्मेही पूजतात.

**श्रीकृष्ण भगवान नव्हते, देवता होते-**

आज बरेच जण श्रीकृष्णाला भगवान मानतात. याचे कारण म्हणजे जन्मताच त्यांना दुहेरी मुकुट (प्रकाशाचा व राजाईचा) प्राप्त होते. असे असले तरी श्रीकृष्णाला भगवान म्हणणे चुकीचे आहे. त्यासाठी सर्वांनी हे समजून घेतले पाहिजे की सुंदर तन, स्वस्थ मन, अपरिमित धन तसेच वैकुंठीचे राज्यभाग्य हे सर्व काही मनुष्याला त्यांच्या गतजन्मातील पुरुषार्थाच्या प्रारब्ध रूपाने प्राप्त होत असते. परंतु परमात्मा तर कर्म आणि फळ तसेच जन्म आणि मृत्यू यापासून सदा मुक्त आहे. **मुख्य म्हणजे परमात्मा निराकार ज्योतिर्बिंदूस्वरुप आहे. त्यालाच विभिन्न धर्मांत शिव ज्योतिर्लिंगम्, ॐकार, अल्लाह, गॉड, जेहोबा इत्यादी नावांनी संबोधले जाते. तो परमधामनिवासी आहे. सर्व आत्म्यांचा पिता आहे तसेच सर्व देवी-देवतांचा रचयिता आहे**. सर्व गुणांचा तो सागर आहे तोच पतितपावन, पापकटेश्वर, मुक्तेश्वर, सर्वांचा सद्‌गती दाता आहे. तो अजन्मा, अभोक्ता आहे. याउलट श्रीकृष्ण सर्व गुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम, अहिंसा परमोधर्मी तसेच शरीरधारी देवता आहे.

शास्त्रकारांनी श्रीकृष्णाचा जन्म द्वापारयुगात दाखविला आहे, हे देखील चुकीचे आहे. कारण द्वापारयुगानंतर कलियुग आले. तेव्हा विचार करा की द्वापारयुगात श्रीकृष्णाने गीताज्ञान सांगून कलियुगाची स्थापना केली? गीतेत तर भगवंताने स्पष्ट सांगितले आहे की अधर्माचा विनाश व सद्‌धर्माची स्थापना करण्यासाठी मी अवतरित होतो त्यामुळे हाच तो पुरुषोत्तम संगमयुगाचा समय आहे, जेव्हा स्वयं परमात्मा शिव पिता, परमशिक्षक बनून, सर्व आत्म्यांच्या कल्याणार्थ सत्य गीता ज्ञान देत आहेत. हे ईश्वरीय कार्य गेल्या ८० वर्षापासून, परमात्माद्वारा स्थापित, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे विश्वभरात अव्याहतपणे चालू आहे.

**तात्पर्य म्हणजे श्रीकृष्णाचा जन्म द्वापरयुगात झाला नव्हता तर तो सत्ययुगी दैवी सृष्टीचा प्रथम राजकुमार होता. श्रीकृष्णाचेच नाव स्वयंवरानंतर 'श्रीनारायण' असे ठेवण्यात येते.** (त्यामुळेच श्रीनारायणाच्या जन्मकथा आपल्याला कुठल्याही धर्मग्रंथात आढळून येत नाहीत. याचेच गायन भक्तिमार्गात पुढील प्रमाणे केले जाते. 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी । हे नाथ नारायण वासुदेव ।')

त्याचबरोबरशास्त्रात श्रीकृष्णावर अनेक मिथ्या कलंक लावण्यात आले आहेत. उदाहरणार्थ श्रीकृष्णाला १६,१०८ राण्या होत्या. प्रत्येक राणीपासून त्याला १० पुत्र होते. जरा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, साकार दुनियेत हे सर्व असंभव आहे. तसेच त्याला 'गोकुळीचा माखनचोर' असेही दर्शविण्यात आले आहे. वास्तविक श्रीकृष्ण तर सत्ययुगात राजकुमार होता. मग तो असे कृत्य करेलच कसे?

**प्रजापिता ब्रह्मा हेच भविष्यात श्रीकृष्ण बनतात-**

निराकार शिव परमात्मा, सत्ययुगी दैवी

पान क्र. २१ वर

लेखांक - १९ वा

# ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

–**दिवंगत वरिष्ठ भ्राता रमेश शाह** (मुंबई), यांच्या लेखणीतून

ईश्वरीय कार्य व्यवहारामध्ये कशी आदर्श व्यवस्था निर्माण होईल, याबद्दल आपण चर्चा करीत आहोत. मागील लेखात मी लिहिले होते की, ब्रह्माबाबांनी मला पत्रातून लिहिले होते की, बच्चे तुम्हाला बाबांच्या वतीने धनदान स्वीकार करण्याची परवानगी आहे. परंतु ''बच्चे, धनदान घेते वेळी माझ्या जबाबदारीचेही भान ठेवावे लागणार आहे; कारण तुम्ही स्वीकाराल आणि मला द्यावे लागेल''

**यज्ञाचे धन खूपच पवित्र आणि अनमोल आहे. म्हणून या संदर्भात आपल्याला खूप लक्ष ठेवावे लागेल. आपल्याकडून कोणताही अनावश्यक खर्च होता कामा नये. ब्रह्माबाबांचे हे महावाक्य केवळ माझ्यासाठी नाही परंतु बाबांचा यज्ञ म्हणजे झोन, सब झोन, सेवाकेंद्र, उपसेवाकेंद्र इत्यादी संभाळणारे जे निमित्त भाई वा बहिणी आहेत, त्या सर्वांसाठी लागू आहे. सर्वांनी बाबांच्या यज्ञाचे धन अतिशय काळजीपूर्वक खर्च केले पाहिजे...** कारण यज्ञांचे धन काही कमाविलेले धन नाही. परंतु त्याग व समर्पण भावनेने दिलेले धन आहे. म्हणून त्या धनाचा उपयोग चांगल्या रितीने केला गेला पाहिजे. हे धन खूप फलदायक असते... म्हणतात ना, जसे अन्न तसे मन आणि जसे मन तसे धन! म्हणून बाबांच्या यज्ञात भंडारी ठेवण्याची पद्धत आहे. भंडारीमध्ये बाबांची सारी मुले आपली धनरूपी सेवा जमा करतात म्हणजे यथाशक्ती कमाईतील धन सफल करतात. त्यामुळे त्याचा वापर त्या रितीने व्हायला पाहिजे.

काहींनी आपली अचल संपत्ती निशुःल्क सेवार्थ दिली आहे. तर काहींनी आपली साधने निशुःल्क दिलेली आहेत. सेवेसाठी दिलेल्या साधनांचा वा अचल संपत्तीचा उपयोग करताना वा उपभोग घेताना आपण त्या प्रति निष्काळजीपणा करतो; कारण ती आपल्याला मोफत मिळालेली असतात. परंतु शिवबाबांसाठी हे मोफत नाही; कारण त्याचा परतावा त्यांना त्या आत्म्याला द्यावा लागतो. जसे कोणतेही कर्म इच्छे विरहीत होत नाही, त्याप्रमाणे कोणत्याही आत्म्याने बाबांसाठी कोणतेही साधन, संपत्ती इत्यादी निःशुल्क दिली तरी त्याचे रिटर्न त्या आत्म्याला बाबांना द्यावेच लागते म्हणून आपले कर्तव्य आहे की, आपल्याला जे काही निःशुल्क प्राप्त होते त्याचा खुपच सावधानीपूर्वक उपयोग केला जावा. त्या संपत्तीचे वा साधनाचे जर नुकसान झाले तर ते बाबांचे नुकसान होणार नाही. परंतु त्याचा बोजा त्यास निमित्त बनणाऱ्या आत्म्यावर येईल. म्हणूनच निशुल्क मिळालेल्या साधन-संपत्तीचे आपल्याद्वारा काहीही नुकसान होणार नाही, या गोष्टीची खूपच काळजी घेतली पाहिजे.

**ईश्वरीय सेवेची मुख्य ३ साधने आहेत - तनाद्वारे सेवा, मनशक्तीद्वारे सेवा आणि धनाद्वारे सेवा. आपण तन-मन-धनाने सेवा करु शकतो. धनाच्या सेवेने ही धारणा होत जातात. याची अनेक उदाहरणे आपल्याला यज्ञात मिळतात.** आपल्या पवित्र धनाने कशाप्रकारे ईश्वरीय धारणा होत जातात. याबाबत मी पवित्र धन या पुस्तकात लिहिले होते. हे उदाहरण प्रासंगिक असल्याने येथे लिहित आहे. इंदौरचे ओमप्रकाशभाई आणि ज्ञानामृत प्रेसचे आत्मप्रकाशभाई हे आपले दोन भाई पतियाला येथे हॉस्टेलमध्ये राहून शिकत होते. शिक्षण घेत असतानाच त्यांना ज्ञान मिळाले. आत्मप्रकाशभाई यांना, त्यांचे मोठे बंधु लक्ष्मणभाई (जे सध्या सोनीपतमध्ये आहेत.) दरमहा खर्चासाठी १५०/- रु पाठवित असत. त्यातून ते पुस्तकांसाठी वा अन्य गोष्टींसाठी खर्च करीत असत. नंतर ओमप्रकाशभाईने होस्टेल सोडून, एक रुम भाड्याने घेतली आणि त्या जागेमधून त्यांनी ज्ञान देणे सुद्धा सुरु केले. ते स्वतः जेवण बनवित असत व जी रक्कम बचत होई ती ईश्वरीय सेवेला लावित असत. ते शिक्षण घेत होते, कमावित नव्हते. पैसे तर लक्ष्मणभाईंचे होते, जे ईश्वरीय सेवेला लागताच, त्याचे लक्ष्मणभाईंना ईश्वरीय बळ मिळाले आणि ते लवकरच बाबांचे बच्चे बनले. त्यांचे जीवन खूपच तमोगुणी होते परंतु बाबांनी त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले. त्यांच्यातील परिवर्तन पाहून संपूर्ण परिवारच ज्ञानात आला.

असेच पुण्याचे गोविंदभाईचे पण उदाहरण आहे. गोविंदभाई लहानपणापासून आपल्या आईवडिलांबरोबर ज्ञानात चालत होते. परंतु मोठे झाल्यावर ते कार्यव्यवहारार्थ आपल्या आईवडिलांपासून वेगळे झाले नंतर त्यांनी विवाह केला

व बिझनेससाठी परदेशी गेले. एकदा परदेशात जाते वेळी त्यांची कलकत्ता येथे दादी प्रकाशमणी आणि दादा रतनमोहीनीजी यांच्याशी भेट झाली आणि नंतर दादीजी व रतनमोहिनीजी यांना जपानला सेवार्थ पाठविण्यासाठी ते निमित्त बनले. जपानहून परततांना दोन्ही दादी हाँगकाँगला राहिल्या आणि त्यांच्यामुळे गोविंदभाई पुन्हा ज्ञानात चालू लागले. या दरम्यान गोविंदभाईजी सच्चाईने कमविलेले धन घरी पाठवित राहिले. फलस्वरूप त्यांच्या पत्नी लिलाबहेन सुद्धा ज्ञानाकडे आकर्षित झाल्या आणि बाबांची बच्ची बनल्या. हाँगकाँगवरुन गोविंदभाई जेव्हा पुण्याला येत होते तेव्हा ते विचार करीत राहिले की, आता घरी पवित्र कसे रहायचे, खाण्यापिण्याची शुद्धता कशी राखता येईल? त्याचप्रमाणे त्यांच्या पत्नी यांनाही काळजी पडली होती की आता गोविंदभाई घरी येणार आहेत तर पवित्र कसे राहता येईल आणि खाणे-पिणे याबाबत पुढे काय होणार? परंतु घरात जेव्हा ते भेटले तेव्हा दोघांना समजले की दोघेही बाबांच्या ज्ञानात चालत आहेत. त्यानंतर ते दोघेही बाबांच्या सेवाकेंद्रावर जाऊ लागले. अशाप्रकारे सच्चाईने कमाविलेल्या धनामुळे जीवनात श्रेष्ठ धारणा सहजरित्या झाल्या.

या संदर्भात मी माझ्या मागच्या लेखात लिहिले होते की भारतात जशी भगवद्गीता आहे, त्याप्रमाणे चिनी लोकांचा ही एक ग्रंथ आहे त्यास आपण चायनीज गीता म्हणू शकू. त्यात आध्यात्मिक गोष्टी लिहिलेल्या आहेत. त्यातील कितीतरी गोष्टी बाबांनी सांगितलेल्या ज्ञानाच्या धारणांशी सुसंगत आहेत. त्यांची ही गीता विशेषकरून ५० वर्षे वरील व्यक्तींसाठी आहेत. त्यात पहिली गोष्ट हीच लिहिलेली आहे की, **आता आपण जीवनाच्या संध्येकडे वळत आहोत आणि लक्षात असू द्या की आपल्याबरोबर धन जाणार नाही परंतु आपले पुण्य कर्म सोबत करतील, म्हणून याबद्दल विचार करा आणि धन सफल करा.** पुढे असं लिहिले आहे की, आपण शरीर सोडल्यानंतर मागे लोक आपली स्तुती करतील वा निंदा, ते आपण अनुभवणार नाही परंतु आपण जर धन सफल केले तर त्या आधारावर लोक आपले स्मरण करतील. यासाठी जितके शक्य होईल तेवढे धनाचे दान करून, धन सफल करावे. दुसरी अशी गोष्ट लिहिलेली आहे की, आपले जीवन शांती, आनंदाने व्यतीत करा. धनाचा हवा तितका उपयोग वा उपभोग घ्या. परंतु आपली मुले-नातवंडाच्यासाठी जमा करायचे ध्येय ठेवू नका, अन्यथा ते परावलंबी बनतील आणि तुम्ही कधी जग सोडून जाल, याची वाट पहात राहतील. तेच तुमच्या धन-संपत्तीचे मालक बनतील. **तुमच्या परिवारातील प्रत्येक सदस्य स्वतःचे भाग्य घेऊन जन्माला आलेला आहे. म्हणून तुम्ही आपल्या मुलांबरोबर प्रेमपूर्वक व्यवहार करा, त्यांना भेटवस्तू इ. द्या परंतु त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी पूर्ण मदत करा. ज्यामुळे ते आत्मनिर्भर होऊन, स्वतःच्या पुरुषार्थाने श्रेष्ठ बनू शकतील** आणि तुमच्यावर अवलंबून रहाणार नाहीत.

अमेरिकेतील एक धनाढ्य व्यक्ती वॉरेन बफेटचे उदाहरण सादर करीत आहे. आपल्या काळात ते विश्वातील दुसऱ्या क्रमाकांचे धनाढ्य व्यक्ती होते. त्यांना तीन मुले होती. त्यांनी आपल्या तिन्ही मुलांना विचारले की, माझे निधन झाल्यावर माझ्या संपत्तीमधील तुम्हाला काय हवे? त्यावर त्यांच्या मुलांनी त्यांना लेखी जबाब दिला की, बाबा तुम्ही आम्हाला जन्म दिला, आमचे पालनपोषण केले, शिक्षण दिले आणि लायक बनविले. आता आम्ही आमच्या पायावर उभे आहोत आणि व्यवस्थित धन कमावित आहोत. म्हणून आम्हाला तुमच्या धनाची काही अपेक्षा नाही. तुम्हाला जसे हवे तसे धनाचा सदुपयोग करा आणि आपले भाग्य बनवा. मुलांचे म्हणणे समजून घेतल्यावर वॉरेन बफेट. मायक्रोसॉफ्टचे प्रमुख बील गेटस् कडे गेले आणि आपले खूप सारे धन त्यांच्या धर्मदाय ट्रस्टमध्ये सफल केले.

तिसरी गोष्ट चायनीज गीतेत अशी लिहिली आहे की, आपल्या मुलांकडून जास्त अपेक्षा ठेवू नका कारण त्यांचे स्वतःचे भविष्य, परिवार, नोकरी-धंदा इ. असते आणि ते त्यात व्यस्त असल्याने तुम्हाला अधिक वेळ देऊ शकत नाही. त्यामुळे तुम्हाला जर त्यांच्याकडून अधिक वेळ प्रेम मिळाले नाहीतर काळजी करू नका. पुढे असे म्हटले आहे की, अनेकदा मुले तुमच्या संपत्तीमध्ये आपला हक्क मागतात आणि आपल्या सोयीनुसार खर्च करू इच्छितात. परंतु स्वकष्टाने कमावलेली संपत्ती तुमच्या स्वतःची असते आणि त्यामुळे त्यावर दुसरा कुणाचाही अधिकार नसतो. **त्यांनी पुढे असेही लिहिलेले आहे की जर तुमचे वय ५० वर्षाचे झाले असेल तर अधिक धनप्राप्तीसाठी स्वतःचे स्वास्थ्य बिघडू देऊ नका. कारण धन तुम्हाला स्वास्थ्य देवू शकत नाही.** तुम्ही किती ही धनवान असा, आपल्याजवळ खूप महाल, जमीनजुमला इ. आहे परंतु रात्री जेव्हा तुम्ही झोपता तेव्हा तुम्हाला केवळ दोन चौ. मीटर एवढीच जागा उपयोगात येते.

आपल्याकडे जर भोजनासाठी आणि जीवन जगण्यासाठी पर्याप्त धन असेल तर धन संचयाबद्दल अधिक विचार करू

नका. कधीही इतरांच्या धनसंपत्तीशी स्वतःची तुलना करू नका. कारण प्रत्येकाचे आपापले भाग्य असते. तेव्हा अशा गोष्टींबद्दल विचार करू नका ज्यांना तुम्ही बदलू शकत नाही. अन्यथा तुमचेच स्वास्थ्य अशा व्यर्थ चिंतनाने खराब होऊन जाईल. तुमच्याजवळ जितके धन आहे त्याच्यावर आपले जीवन व्यवस्थित व्यतीत करा.

अशाप्रकारे धनाबाबत अनेक विचार चायनीज गीतेमध्ये नमूद केलेले आहेत. शास्त्रांमध्ये धनाला माया म्हणून संबोधले जाते आणि म्हणून लोक धन, परिवार त्याग करून संन्यासी बनतात. **परंतु शिवबाबांनी दिलेले ज्ञान, आपण प्रत्येकाने धनाचा कसा सदुपयोग करावा आणि धन आपल्या भविष्यातील प्रालब्ध बनविण्यासाठी कसे निमित्त बनू शकते, हे स्पष्ट करते.**

**(भावानुवाद - बी. के. जयश्रीबहेन, विक्रोळी, मुंबई.)**

पान क्र. १८ वरून

दुनियेच्या स्थापनेसाठी, प्रजापिता ब्रह्मा यांच्या मुखाद्वारे ईश्वरीय ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात. त्याची धारणा करण्याचा नंबरवन पुरुषार्थ, प्रजापिता ब्रह्माबाबा हेच करतात. त्याग-तपस्या-सेवा यांच्या जोरावर ते संपूर्ण कर्मातीत अव्यक्त फरिश्ता स्थिती प्राप्त करतात. फलस्वरूप ते भविष्यात श्रीकृष्ण बनतात, असे त्रिकालदर्शी परमात्मा शिव पित्याने सांगितले आहे. त्यामुळेच भक्तिमार्गात 'ब्रह्मा सो विष्णु' व 'विष्णु सो ब्रह्मा' असे गायन केले जाते. तसेच विष्णुच्या नाभीतून ब्रह्मा उत्पन्न झाल्याचे दर्शविण्यात येते.

**श्रीकृष्ण भारतात पुन्हा लवकरच येत आहेत.**

गीतेतील हे जे महावाक्य आहे की, 'मी धर्मग्लानीच्या वेळी अवतरित होतो' हे परमपिता शिव परमात्म्याचे आहे. प्रत्येक कल्पाच्या अंती निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात अवतरित होऊन, आदि सनातन देवी-देवता धर्माची पुनर्स्थापना करतात व शंकराद्वारे विश्व युद्धासाठी प्रेरित करून, अधर्माचा विनाश (अर्थात भ्रष्टाचारी सृष्टीचा महाविनाश) करवितात. अशाप्रकारे जेव्हा अधर्माचा विनाश व सद्धर्माची स्थापना होते तेव्हा विष्णुचे रूप श्रीकृष्ण भारतात जन्माला येतो व त्यांच्याद्वारे नवसृष्टीची पालना होते.

**प्रिय बंधुंनो, आता भगवान शिव आपली दोन्ही कर्तव्ये प्रजापिता ब्रह्मा आणि शंकराद्वारे करवित आहेत. तसेच निकट भविष्यात होणाऱ्या ॲटॉमिक विश्वयुद्ध व महाविनाशानंतर, सत्ययुगी सृष्टीच्या प्रारंभी श्रीकृष्ण भारतात पुन्हा लवकरच येत आहे. अशा या सत्ययुगी स्वर्गीय दुनियेत राज्यभाग्य प्राप्त करणे, हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे. कारण आपण स्वर्ग रचियता परमात्मा शिवपित्याची मुले आहोत.**

# शपथ सारे घेऊया

भारताला स्वर्ग बनवू या,
ही शपथ सारे घेऊ या ।।धृ।।

सोडूनी दुष्ट पाच विकार,
पवित्र आपण बनू या ।
दैवीगुण धारण करुनी,
दैवी स्वराज्य आणू या।।१।।

शिवबाबांची मुले आपण,
भाऊ-भाऊ बनून राहू या ।
सत्याचा संग धरुनी सदा,
सत्ययुग सृष्टीवर आणू या ।।२।।

हिंमत, साहस ना सोडूया,
धैर्याने पाऊल टाकू या ।
शिवबाबांच्या निरंतर स्मृतीने,
मायाजीत आपण बनू या ।।३।।

अमृतवेळी उठूनी आपण,
ज्ञानप्रकाश पसरवूया ।
कर्मबंधनांचा गुंता सोडूनी,
प्रेमाने जग जिंकूया ।।४।।

**ब्र कु विमल पंढरपूरे**, नवी सांगवी (पुणे)





(भाग १)

# मनुष्यसृष्टीला प्रदूषित करणाऱ्या देहाभिमानाचा व मनोविकारांचा त्याग हा त्याग नव्हे!

– ब्रह्माकुमार जगदीश दीक्षित, पुणे

**आदि स्वरूपात श्रीकृष्णा सहित सर्व देवात्मे सर्वगुण संपन्न, पवित्रतेच्या सोळा कला संपन्न, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम व अहिंसा परमोधर्माचे प्राकृतिक आचरण करणारे होते. परमात्मा वर्तमान समयी सर्व आत्म्यांना आवाहन करीत आहे की, तुम्हीही ही देवतांची पदवी पुरुषार्थाने धारण करून अल्पावधीत निर्माण होणाऱ्या सत्ययुगात देवत्वपद प्राप्त करू शकता.**

**प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाद्वारे स्वतः परमात्मा, मनुष्य आत्म्याचे चरित्र उत्थान करून, त्याला संपूर्ण चारित्र्यसंपन्न बनवित आहे. त्यासाठी तो प्रथमतः आत्म्याच्या अनादि गुणांचे त्याचबरोबर त्याच्या आदि स्वरूपाचे व आदि गुणांचे ही ज्ञान देतो.** आदि स्वरूपात श्रीकृष्णा सहित सर्व देवात्मे सर्वगुण संपन्न, पवित्रतेच्या सोळा कला संपन्न, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम व अहिंसा परमोधर्माचे प्राकृतिक आचरण करणारे होते. परमात्मा वर्तमान समयी सर्व आत्म्यांना आवाहन करीत आहे की, तुम्हीही ही देवतांची पदवी पुरुषार्थाने धारण करून, अल्पावधीत निर्माण होणाऱ्या सत्ययुगात देवत्वपद प्राप्त करू शकता.

हे अलौकिक पद प्राप्त करण्यात मुख्य बाधा आहे ती पाच मनोविकारांची, परंतु ज्यावेळी ब्रह्मावत्सांना हे ज्ञान प्राप्त होते की, कामक्रोधादि विकारांच्या कारणेच आत्म्याचे जन्मजन्मांतर अकल्याण अर्थात पतनच होत आले आहे. त्यावेळी ते विकारांचा सहजपणे त्याग करतात. त्यांनी केलेला हा त्याग फार मोठा त्याग समजला जातो. परंतु ह्या अकल्याणकारी मनोविकारांचा त्याग हा त्याग निश्तिच नव्हे! विचार करावा की, दैहिक विकार औषधोपचाराद्वारे देहातून काढून टाकणे अथवा स्नानाद्वारे देहावरील मळाचे निर्मूलन करणे ह्या प्रक्रियांना त्याग म्हणता येईल काय? घरात साठलेला कचरा घराबाहेर काढणे ह्या प्रक्रियेला त्याग म्हणता येईल काय? तद्वतच जन्मजन्मांतर आत्म्यावर चढलेला पाच मनोविकारांचा मळ काढणे हा वास्तविक त्याग नसून ही तर आत्म्याला स्वच्छ अर्थात पुण्यात्मा बनविण्याची प्रक्रिया आहे. बंधुनो, ह्या **मनुष्यसृष्टीचा हा नियम आहे की, जोपर्यंत मनुष्यआत्मा काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या पाच मनोविकारांचे निर्मूलन करून, सदा पावन व पतितपावन असलेल्या परमात्म्याशी योगयुक्त होवून आत्म्याचे शुद्धिकरण करीत नाही, तोपर्यंत तो पुण्यात्मा बनू शकत नाही.**

आत्म्याचे पतन करून त्याला पापात्मा बनविणाऱ्या ह्या अकल्याणकारी मनोविकारांचे निर्मूलन करणे हे तर प्रत्येक मनुष्यात्म्याचे परमकर्तव्य आहे. ज्याप्रमाणे घरातील नोकराच्या मनांत संपत्तीचा लोभ निर्माण झाल्यास तो परिवारातील सदस्यांना जीवे मारू शकतो. अशा नोकराची धोकादायक लक्षणे दिसताच परिवार प्रमुख त्याला शत्रू समजून घराबाहेर काढतो. तद्वतच आत्म्याचे अकल्याण करणाऱ्या ह्या विकारांचे मनरूपी घरातून उच्चाटन करणे आवश्यक आहे. ह्या विकारांना संत महात्म्यांनी 'षड्रिपु' म्हटले आहे. षड्रिपु अर्थात सहा शत्रू! श्रीपद् भगवद् गीतेत तर 'काम' नांवाच्या मनोविकाराला 'महाशत्रू' म्हटले आहे. परंतु अज्ञान अंधःकारात पथभ्रष्ट झालेल्या मनुष्याने ह्या महाशत्रूला आपला महामित्र मानले आहे. ह्या मित्राचा सहवास न लाभल्यास क्रोध ही उत्पन्न होवू शकतो. बंधुनो, हा महामित्र मानवमात्राचा कपटी मित्र असून आत्म्याचे अल्पावधीत शीघ्र पतन करणारा वास्तविक शत्रूच आहे. **भगवद् गीतेत ही ह्या विकाराविषयी म्हटले आहे, ''हे अर्जुना, ज्ञानरूपी तलवारीने कामरूपी शत्रूला नष्ट कर.'' वर्तमान समयी अवतरित होवून पतितपावन शिव परमात्म्याने कामविकाराला महाशत्रूच म्हटले आहे.** परंतु बहुतांश भारतीयांची गीताग्रंथावर अधिक श्रद्धा असल्याने त्यातील दाखले देणे क्रमप्राप्त आहे. ३२ वर्षापूर्वी लेखकाने परमात्म ज्ञानाची खातरजमा करण्यासाठी संस्कृत श्लोकांचा मराठी भाषेत अर्थ असलेल्या भगवद् गीतेचे अभ्यासपूर्वक वाचन केले आहे. त्यानंतरच मनाचा हा दृढ निश्चय झाला की, मज

**भगवद्‌गीतेत ही ह्या विकाराविषयी म्हटले आहे, ''हे अर्जुना, ज्ञानरूपी तलवारीने कामरूपी शत्रूला नष्ट कर.'' वर्तमान समयी अवतरित होवून पतितपावन शिव परमात्म्याने कामविकाराला महाशत्रूच म्हटले आहे.**

आत्म्यालाही ह्या पाच मनोविकारांवर विजय प्राप्त करावयाचा आहे. जर मनुष्य दृढ संकल्पाद्वारे हिमालयाचे एव्हरेस्ट शिखरही गाठू शकतो, तर तो आपल्या दृढ संकल्पाद्वारे पाच मनोविकारांवर विजय प्राप्त करू शकत नाही काय?

**मनोविकार निर्माण होण्याचे मुख्य कारण आहे आत्म्याची व त्याच्या मूलभूत गुणांची विस्मृती होणे. ह्याच विस्मृतीच्या कारणे मनुष्य स्वतःला देह समजू लागतो. सदा देहभान राहिल्याने देहाभिमान निर्माण होतो., बंधुनो, देहाभिमानाची वृत्ति ही काही मानवाची मूळ वृत्ती नव्हे, त्याची मूळ वृत्ती अथवा गुणधर्म आहे आत्माभिमान!** जो गुणधर्म सत्ययुग, त्रेतायुगात दैवी मानवाच्या आत्म्यात प्राकृतिक स्वरूपात होता. कोणताही पदार्थ आपला मूळ गुणधर्म सोडीत नाही. मीठ खारटपणाचा, चिंच आंबटपणाचा, मिरची तिखटपणाचा, आवळा तूरटपणाचा तर गूळ, साखर गोडपणाचा गुणधर्म कधीच सोडीत नाही. अन्य प्राणीही आपले मूळ गुणधर्म सोडीत नाहीत. कुत्रा भुंकण्याचा, मांजर म्याँव म्याँव करण्याचा, वाघ निर्भयपणाचा तर ससा घाबरण्याचा गुणधर्म कधीच सोडीत नाही. मनुष्याने मात्र आपला आत्माभिमानीपणाचा मूळ गुणधर्म अथवा आत्माभिमानी वृत्ति सोडल्याने तो देहाभिमानी वृत्तीचा झाला आत्ते. ही वृत्तीच त्याच्यासाठी महाघातक ठरली आहे. पाच मनोविकारांच्या निर्मितीचे मूळ देहाभिमान आहे. हे मनुष्याला ज्ञात नसल्याने देहाभिमान नष्ट न करताच त्याने मनोविकारांना नष्ट करण्याचा निष्फळ प्रयत्न केला आहे. बंधुनो, ज्यांचे आपण आपल्या देवघरातही गायन पूजन करतो, ते आपले प्रथम पूर्वज अर्थात कुलस्वामी व कुलस्वामिनी आत्माभिमानी असल्याने संपूर्ण निर्विकारी होते.

सर्वसामान्य मनुष्याला हा प्रश्न निश्चितपणे मनात येतो की, जर देवी देवता संपूर्ण निर्विकारी होते तर त्यांना संतती कशी प्राप्त होत असे? ह्याचे गुह्यरहस्य प्रजापिता ब्रह्माच्या शरीरात अवतरित होवून सत्य परमात्म्याने प्रगट केले आहे की, देवी देवतांना केवळ योगबळानेच संतती प्राप्त होते! हे देवतांच्या भक्तजनानों, अल्पसा विचार करा की, त्यांनाही भोगबळाने संतती झाली तर कलियुगी मानव व सत्ययुगी मानव (देवी देवता) ह्यात अंतर ते काय राहिले? 'कामविकार हे नर्काचे द्वार आहे' असे गीतेत म्हटले आहे. संपूर्ण निर्विकारी असलेल्या देवी देवता स्वर्गात ही नरकाचे द्वार उघडू शकतील काय? तसेच सत्ययुगी स्वर्गात हा कामविकार असेल तर त्याला स्वर्ग म्हणता येईल काय? मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम व श्रीकृष्ण ह्या दोन देवतांची वास्तविक जीवनकहाणी प्रायः लोप पावल्याने ते संपूर्ण निर्विकारी होते, हे कोणाला ही ज्ञात नव्हते. श्रीरामा विषयी म्हटले जाते की, **''जहाँ राम है वहाँ काम नहीं''. कमलासनात विराजमान असलेल्या श्री लक्ष्मीचे चित्र दर्शविते की, तिचे जीवन पवित्र होते. चतुर्भुज विष्णू हे तर श्री लक्ष्मी व श्री नारायण ह्यांच्या पवित्र प्रवृत्तीचे प्रतीक आहे. ह्या चतुर्भुज रूपात दोन हात श्री लक्ष्मीचे तर दोन हात श्री नारायणाचे आहेत.** श्री लक्ष्मीनारायण ह्यांच्याप्रमाणे वर्तमान समयी पवित्र प्रवृत्ती (गृहस्थी) अस्तित्वात नसल्याने कलियुगातील कोणत्याही जोडप्याला श्री लक्ष्मीनारायणाची उपमा देणे यथायोग्य आहे काय? मर्यादा पुरुषोत्तम श्रीकृष्णाच्या संपूर्ण निर्विकारीपणाचे प्रतीक आहे, त्याच्या रत्नजडित सुवर्ण मुगुटात दर्शविलेले मोरपीस! असे हे मोरपीस दर्शविण्यामागे कोणते रहस्य आहे हे न जाणल्याने, सोळा कला संपन्न अर्थात संपूर्ण पवित्र असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीकृष्णाला सोळा सहस्त्र नारींचा कलंक लावला गेला आहे. बंधुनो, त्या मोरपीसाचे आध्मात्मिक रहस्य हेच आहे की, मोराच्या पिल्लाचा जन्म अन्य प्राणीमात्रा प्रमाणे होत नसून, लांडोरी केवळ मोराचे अश्रू प्राशन करते व त्यातूनच तिला गर्भधारणा होते. हे रहस्य कोट्यावधी मनुष्यात्म्यांना ज्ञात नसल्याने श्रीकृष्णाच्या शिरी दर्शविलेल्या मोरपीसाचेही गुह्य रहस्य त्यांना ज्ञात नाही. आत्मा जितका निर्विकारी अर्थात सुंदर असेल तर तितकाच त्याला देहही सुंदर प्राप्त होतो. म्हणून मोर हा सर्वात सुंदर व नयनरम्य पक्षी आहे. तद्वतच देवात्मे निर्विकारी असल्याने त्यांना सात्विक सौंदर्य प्राप्त होते. त्यांचे हे सौंदर्य अबाधित राहण्यासाठी ते केवळ योगबलानेच आपली संतती प्राप्त करतात. परंतु त्यांनाही भोगबलानेच संतती प्राप्त होत असावी असे भ्रष्ट अनुमान मानवी मनात निर्माण झाले. ह्या घोर

अनुमानित अज्ञानामुळे दक्षिण भारतातील अनेक मंदिरात देवी देवतांच्या विकृत शिल्पाकृति दर्शविल्या आहेत. अशा शिल्पाकृति दर्शविणे हा तर त्यांच्या संपूर्ण पवित्र जीवनाला, संपूर्ण अपवित्र मानवाने लावलेला कलंक नव्हे काय? हीच ती अतिधर्मग्लानी होय! वास्तविक देवी देवता संपूर्ण पवित्र असल्याने त्यांच्या हातात कमलपुष्प दर्शविले जाते. ह्याच कारणे त्यांच्या कर्मेंद्रियाना मुखकमल, कमलनयन, कमलहस्त व पादकमल असे सन्मानपूर्वक व भक्तिभावाने म्हटले जाते. बंधुनो, देवतांचे शरीर व आत्मा दोन्ही पवित्र असल्याने त्यांच्या जडमुर्तीचे देखील गायन व पूजन केले जाते. ५००० वर्षापूर्वी ह्याच देवी देवतांनी भारतात राज्य केले होते. त्या श्रेष्ठाचारी भारताचे प्रथम महाराणी व महाराजा श्री लक्ष्मीनारायण होते. त्यांच्या दैवी राज्यात संपूर्ण सुखशांति व पवित्रता होती. त्याकाळची सत्ययुगी दैवी संस्कृती व वर्तमान काळची कलियुगी असुरी संस्कृती ह्यात जमीन आस्मानाचे अंतर आहे. म्हणून सत्ययुगी भारताला स्वर्ग अथवा क्षीरसागर म्हटले आहे. तर कलियुगात संपूर्ण विश्वच विषय वासनेच्या आहारी गेल्याने ह्या युगाला नर्क अथवा विषय सागर म्हटले आहे. **जेथे हे पाच मनोविकार नाहीत तेथे स्वर्ग आहे व जेथे ह्या पाच मनोविकारांचा प्रकोप झाला आहे. तेथे निश्चितपणे नर्क आहे. सर्वशास्त्र शिरोपणी भगवद् गीतेतही महावाक्य आहे की, 'काम, क्रोध व लोभ ही तीन नरकाची द्वारे आहेत.'** (अध्याय १६-२१) ह्या महावाक्यावरून हे सिद्ध होते की, द्वापरयुगापासूनच विकर्मांच्या आधारे मनुष्यात्म्यांनी नरकाचे द्वार उघडले असल्याने, त्यांचे आत्मिक पतन झाले आहे. इंद्रियांची अधीनताच आत्मिक पतनाचे प्रमुख कारण आहे.

ब्रह्माकुमारी ही विश्वातील एकमात्र अशी आध्यामिक संस्था आहे, जेथे केवळ अवतरित झालेल्या सत्य परमात्म्याचे सत्यज्ञानच सांगितले जाते. सदरहू ज्ञानाच्या आधारे ह्या साकार सृष्टीवर स्वर्गाचा नर्क मनुष्यात्म्यांच्या द्वारे कसा निर्माण झाला आहे हे स्पष्टपणे सांगितले जाते. वर्तमान समयी परमात्मा ह्याच नरकीय सृष्टीला पुनःस्वर्ग बनविण्यासाठी ज्ञान व योगाच्या आधारे मनुष्यात्म्यांचे मन परिवर्तन करुन, त्यांना निर्विकारी बनवितो अर्थात आत्म्यातील कामक्रोधादि विकारांचे सूक्ष्म विष प्राशन करतो. **मनुष्यसृष्टीतील विष प्राशनाचे हे कर्तव्य कर्म शिव परमात्मा संगमयुगावरच करतो. ह्या महान व अत्यंत कठीण अशा कर्माची यादगार म्हणून शिवलिंगावर धोतऱ्याचे विषारी फूल वाहण्याची परंपरा आहे. परंतु शिवलिंगाला शंकराची प्रतिमा मानल्याने शंकरानेच हे विष (हलाहल) प्राशन केले होते, अशी मान्यता 'समुद्रमंथन' ह्या पुराण कथेच्या द्वारे दिली गेली.** बंधुनो, परमात्म्याच्या ह्या अद्वितीय विष प्राशनामुळे सत्ययुग, त्रेतायुगांत ही मनुष्यसृष्टी मनोविकारांच्या विषातून पूर्णतः मुक्त झाल्याने ह्या दोन युगांना स्वर्ग म्हटले जाते.

द्वापरयुगापासून मानव ह्या विकारांच्या बंधनात अधिकाधिक बद्ध होत जातो. कलियुगात तर तो ह्या कामविकाराच्या पूर्णतः अधीन होतो. आपल्या विकारी कर्मांचे समर्थन करताना बहुतांश मनुष्यात्मे आपले मत प्रगट करतात की, हा कामविकार सृष्टीची वृद्धि होण्यासाठी परमात्म्यानेच निर्माण केला आहे. थोडा विचार केल्यास बुद्धीत ज्ञानाचा हा प्रकाश पडेल की, कामविकार परमात्म्याची निर्मिती नसून, ह्या विकाराच्या आधारे मनुष्याला संतती प्राप्त व्हावी हे व्यवस्थापन प्रकृतीचे (निसर्गाचे) अवश्य आहे परंतु ह्या विकारामुळेच मनुष्यात्मा शीघ्र गतीने पतित होत जातो. बंधुनो, ज्याप्रमाणे वृक्षांना फळे येणे प्रकृतिकृत आहे तद्वतच संतती हे मानवी फळ आहे. इच्छित फलप्राप्तीनंतरही मनुष्य ह्या कामविकारातून मुक्त होवून, पुण्यात्मा बनण्यासाठी कोणताच पुरुषार्थ करीत नाही. **परंतु असा पुरुषार्थ करवून घेणारा केवळ सर्वशक्तिवान परमात्माच आहे. त्यासाठी त्याची महावाक्य आहेत. ''यह कामविकार आदि, मध्य अंत दुःख देनेवाला है, यदि तुम इससे मुक्त होना चाहते हो, तो ज्ञान और राजयोग से मै तुम्हे मुक्त कर दूंगा।'' इस एक अंतिम जन्ममें गृहस्थ व्यवहार में रहते हुए कमल फूल समान पवित्र अवश्य बनना है। क्योंकि, अपवित्र आत्मा वहाँ (सत्ययुग मे) जन्म नहीं ले सकती। वहाँ यह विष अंशमात्र भी होता नही।''** अर्थात जेथे विष नाही तेथे अमृत आहे. सत्ययुगी स्वर्गात दैवी मानवाचे मन अमृतासमान अथवा कमलपुष्प समान निर्मल असते. त्याला ह्या पांच मनोविकारांची पूर्णतः अविद्या असते. दोन युगानंतर मात्र तो देहाभिमानात येतो. परिणाम स्वरूप काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार ह्या पाच विकारांचा कचरा त्याच्या मनांत निर्माण झाल्याने, सत्ययुग त्रेतायुगातील प्रदूषणमुक्त पवित्र वातावरण नष्ट होवून, ह्या पृथ्वीतलावर अपवित्रतेचे प्रदूषण निर्माण होवू लागते. वर्तमान समयी स्थूल प्रदूषणाची चर्चा सर्वत्र केली जाते.

धुलिकण, धूर, कारखानदारी, वाहनांची वाढती संख्या, दुर्गंधयुक्त कचरा इत्यादी कारणामुळे प्रदूषण वाढत चालले आहे. परंतु मानवी मनातील विकल्पांच्या द्वारे निर्माण होणारे जे सूक्ष्म प्रदूषण आहे त्याला फारच थोडे मनुष्यात्मे जाणतात. बंधुनो, हे त्रिकाल बाधित सत्य आहे की, समस्त मनुष्यात्मे किती शुद्ध, किती अशुद्ध कर्म व संकल्प, करतात ह्यावरच स्वर्ग अथवा नरकाचे वातावरण, ह्या पृथ्वीतलावर निर्माण होत असते. कामविकाराचे संकल्प, नैराश्याचे संकल्प, क्रोधाचे अथवा बदला घेण्याचे संकल्प, लोभाचे संकल्प, अनेकानेक बऱ्या वाईट प्रसंगामुळे निर्माण होणारे दुःखद संकल्प, अहंकार दुखविला गेला अथवा अपमान झाल्यानंतर निर्माण होणारे संकल्प अशा सर्व विकल्पांच्या कारणामुळे वर्तमान समयी ह्या विश्वात नरकीय वातावरण निर्माण झाले आहे. मानवी संकल्पांचा तसेच त्याच्या आत्मिक स्थितीचा परिणाम पाच तत्त्वांवरही होतो मानव तमोप्रधान झाल्याने पाच तत्त्वेही तमोप्रधान होवून विनाशकारी झाली आहेत. अन्य प्राणीमात्रावरही मानवी संकल्पांचा व कर्मांचा परिणाम अवश्य होतो. जगातील स्थूल व सूक्ष्म प्रदूषणाला केवळ मानवच जबाबदार आहे. मनुष्यात्मे जर शुद्ध संकल्प करतील तर वातावरणही शुद्ध निर्माण होते. ह्याचे उत्तम उदाहरण मंदिराचे देता येईल. देवतांच्या मूर्ती समोर आल्यानंतर भक्तगणांचे संकल्प शुद्ध असल्याने तेथील वातावरणही पवित्र व मंगलमय बनते. बंधुनो, जर देवी देवतांच्या जड मुर्तीतील पावित्र्याच्या प्रभावामुळे वातावरण शुद्ध व पवित्र होत असेल तर ह्याच सत्ययुगी देवी देवता ज्यावेळी चैतन्यामध्ये असतील त्यावेळी सर्वत्रच किती मंगलमय व पवित्र वातावरण असेल? तेथे ना स्थूल प्रदूषण ना विकल्पांचे सूक्ष्म प्रदूषण ना विकर्माचे प्रदूषण! अशा सर्वप्रकारच्या प्रदूषणमुक्त युगालाच स्वर्ग म्हणणे यथायोग्य होईल आणि म्हणूनच सत्ययुग, त्रेतायुगाला स्वर्ग तर द्वापर कलियुगाला नर्क म्हटले जाते.

मानवी कर्मेंद्रियांपैकी दोन चक्षु प्रथमतः पाहण्याचे कर्म करतात. ज्याप्रमाणे एखाद्या दागिन्याची अथवा हिऱ्याची डबी आपण चर्म चक्षुंनी पहात असतानाही, बुद्धीचा तिसरा नेत्र केवळ डबीतील हिऱ्याला पहात असतो. **तद्वतच चर्मचक्षुंना हा चर्मयुक्त देह दिसत असतानाही बुद्धीच्या अथवा ज्ञानाच्या तिसऱ्या नेत्राने आत्म्याला पाहण्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. दृष्टीच्या परिवर्तनानेच सृष्टीचे परिवर्तन होईल. आत्मिक दृष्टीद्वारा स्वर्गीय मानवी सृष्टी निर्माण होते,** तर केवळ हाडामासाच्या देहाला पहाण्यामुळे अर्थात दैहिक दृष्टीमुळे नरकीय सृष्टी निर्माण होते. हीच दृष्टी काम व मोह ह्या विकारांची निर्मिती करते. जर नवसृष्टी रचयिता परमात्म्याला सहयोग द्यावयाचा असेल तर देहाभिमाना सहित मनोविकारांचे तसेच दृष्टी व वृत्तीचे प्रदूषण नष्ट करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी मनांत विकल्पच निर्माण होणार नाहीत ह्याची दक्षता घ्यायला हवी. दुसऱ्या शब्दात हेच म्हणता येईल की, पाच मनोविकारांचा कचरा काढून जीवनात पवित्रता धारण करणे क्रमप्राप्त आहे. **माझ्या प्रिय भारतवासी बंधु-भगिनींनो, आपल्या सर्वांना सुखशांतीचे रामराज्य हवे असेल तर मनोविकारांचे प्रतीक असलेल्या ह्या दशमुखी रावणाचे मनरुपी लंकेवरील साम्राज्य उध्वस्त करावयास हवे. अर्थात निर्विकारी बनणे अत्यावश्यक आहे. सत्ययुगी रामराज्यातील प्रत्येक मनुष्यात्मा निर्विकारी असल्याने, तो आपल्या कर्मेंद्रियांचा राजा असतो.** कलियुगाच्या अंतिम चरणात मात्र आत्म्याने आपले राज्य कर्मेंद्रियरूपी प्रजेच्या अधीन केल्याने, आत्म्यातील राजाईचे संस्कार नष्ट होवून प्रजातांत्रिक राज्य निर्माण झाले आहे. आत्म्याची अधीनता हेच प्रजातांत्रिक राज्य निर्माण होण्याचे गुह्य रहस्य असावे. ह्या प्रजातांत्रिक राज्यात रावणाने (पाच मनोविकारांनी) हलकल्लोळ माजविला आहे. भारतात ह्या रावणाची प्रतिमा 'प्रति' वर्ष दहन केली जाते परंतु मानवी मनातील सूक्ष्म रावण मात्र नष्ट होत नाही. **ह्या रावणाला नष्ट करणारा केवळ निराकार परमात्मा शिवरामच आहे. तो पुरुषोत्तम संगमयुगावर अवतरित होवून मनुष्यात्म्यांना ज्ञान व राजयोगाची शस्त्रे प्रदान करतो. बंधुनो, ह्या अमोघ शस्त्रांच्या द्वारेच युगप्रवर्तक परमात्मा ह्या विश्वात एक महान आध्यात्मिक क्रांती घडवून आणीत आहे. ही क्रांती आहे, रावणराज्याचा बिमोड करून सुखदायी असे रामराज्य अर्थात सत्ययुग स्थापन करण्याची!** ही क्रांती आहे, तमोप्रधान असुरी आत्म्यांना सतोप्रधान देवात्मा बनविण्याची!! ही क्रांती आहे कवडीतुल्य जीवनाला हिरेतुल्य बनविण्याची!!! ही क्रांती आहे नरकाला स्वर्गात परिवर्तन करण्याची!!!

**क्रमशः.....**

# अलौकिक [ईश्वरीय] जी.एस.टी.

ब्र. कु. चंद्रशेखर, शांतिवन (आबू रोड)

**विचार हे सर्व कर्मांचे बीज आहे, त्यामुळे जो मनुष्य या सृष्टी रूपी कर्मक्षेत्रात शुद्ध वा श्रेष्ठ विचारांचे बीज पेरतो, त्याला अवश्य श्रेष्ठ फळ प्राप्त होते. म्हणूनच म्हटले जाते - 'शुद्ध बीजा पोटी, फळे रसाळ गोमटी'. ईश्वरीय ज्ञानाची मुख्य शिकवण हीच आहे की स्वतःला एक शुद्ध (पवित्र) आत्मा समजा.**

आज भारत देशात (काही अंशी विदेशात) एक शब्द टी.व्ही, इंटरनेट, वॉटस्ॲप तसेच सार्वजनिक ठिकाणी सर्वांच्या मुखी ऐकू येतो, तो म्हणजे जी.एस.टी. (Goods & Services Tax) अर्थात 'वस्तू व सेवा कर'. दिनांक १ जुलै २०१७ पासून हा कर प्रत्यक्षात लागू झाला आहे. एक देश, एक कर, एक मार्केट अशी त्यामागची संकल्पना आहे. त्यामुळे त्याला Good & Simple Tax असेही म्हणतात. या करामुळे काही वस्तू व सेवा महाग होणार आहेत तर काही स्वस्तही होणार आहेत. मात्र हा कर लागू झाल्यानंतर वस्तू व सेवा स्वस्त होण्यासाठी काही कालावधी जावा लागणार आहे. तात्पर्य म्हणजे या दैहिक दुनियेत वावरताना आपणा सर्वांना आता जी.एस.टी भरावा लागणार आहे. या विनाशी देहातून आत्मा जेव्हा निघून जाईल तेव्हा मात्र तो भरावा लागणार नाही. परंतु ईश्वरीय जी.एस.टी. मात्र सतत अविनाशी स्वरूपात, लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंत, सर्व विश्वात एक समान आहे. त्या ईश्वरीय अथवा अलौकिक जी.एस.टी चा भावार्थ आहे-

**G : Good Thoughts (शुभ विचार)**
**S : Simple Living (साधी राहणी)**
**T : Tension Free Life (तणावमुक्त जीवन)**

अशा प्रकारचा हा जी.एस.टी. जर भारतात प्रत्येकाने प्रत्यक्ष रूपात आणला तर भारत भूमीवर पुन्हा स्वर्ग स्थापन होण्यासाठी विलंब लागणार नाही. बघू या तर मग या अलौकिक जी.एस.टी मध्ये काय रहस्य सामावलेले आहेत.

**शुभ विचार -**

विचार हे सर्व कर्मांचे बीज आहे, त्यामुळे जो मनुष्य या सृष्टी रूपी कर्मक्षेत्रात शुद्ध वा श्रेष्ठ विचारांचे बीज पेरतो, त्याला अवश्य श्रेष्ठ फळ प्राप्त होते. म्हणूनच म्हटले जाते - **'शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी'.** ईश्वरीय ज्ञानाची मुख्य शिकवण हीच आहे की स्वतःला एक शुद्ध (पवित्र) आत्मा समजा. या स्मृतीनेच आपला प्रत्येक संकल्प, बोल व कर्म शुद्ध वा पवित्र होण्यासाठी मदत होते.

दुसरी एक गंमत म्हणजे Good या शब्दात God + O अशी चार अक्षरे समाविष्ट आहेत. 'O' अर्थात आत्मा 'बिंदी' असे जर आपण समजले तर Good या शब्दाचा अर्थ होतो, आत्मा व परमात्मा कम्बाइण्ड अर्थात शिवशक्ती. अशा या सर्वश्रेष्ठ स्मृतीत राहिल्याने, आपले प्रत्येक कर्म आपोआपच श्रेष्ठ होत जाते. आपण जेव्हा एक दुसऱ्याला **Good morning, Good afternoon, Good night करतो तेव्हा देखील हीच स्मृती ठेवा की समोरेची व्यक्ती देखील 'शिवशक्ती' आहे. परमात्मा शिव पित्याची सर्वश्रेष्ठ रचना आहे. तात्पर्य म्हणजे जी व्यक्ती God च्या स्मृतीत राहून श्रीमतानुसार कर्म करते, ती भविष्यात देवपद प्राप्त करते.**

**साधी राहणी**

'साधी राहणी - उच्च विचारसरणी' असे म्हटले जाते. कोणत्याही साधुसंतांची, धर्मगुरुंची, थोर विचारवंतांची राहणी बघितली तर ती एकदम साधी असते. श्रीमंती थाट नाही किंवा फाटके कपडे पण नाहीत, दोघांच्या मधली अशी साधी राहणी. महात्मा गांधी केवळ एक पंचा नेसून दैनंदिन कार्य व्यवहार करीत. विदेशात सुद्धा त्याच पोशाखात ते जात असत. संत मीराबाईने तर राजवस्त्र सोडून, पांढरे वस्त्र परिधान करून खरा भक्तिभाव शिकविला. महाराष्ट्रातील थोर संत निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान यांनीदेखील एक धोतर वा पंचा नेसून भागवत धर्माचा प्रचार केला. राहण्यासाठी

पान क्र. ३० वर



# कर्मयोग, भक्तियोग आणि बी के राजयोग

– ब्र. कु. डॉ. दिलीप कौडिण्य एम्. डी. ठाणे

> **बुद्धी आणि चातुर्य यात एक फरक आहे. चातुर्य माणसाला जीवनाकरिता आवश्यक असलेल्या व्यवसायाला शीघ्रतेने आत्मसात करण्याची क्षमता देते. पण बुद्धी म्हणजे परमेश्वराने दिलेल्या चातुर्याचा व तल्लख मेंदूचा यथोचित वापर करण्याची क्षमता देते. जीवनाचे सार काय, असार काय आहे किंवा योग्य आणि अयोग्य काय यांची पारख करण्याची शक्ती देते.**

कलियुगात ईश्वराविषयी मनाचा गोंधळ निर्माण करणाऱ्या बाबींची, युगांतर निर्माण करणाऱ्या महापुरुषांची, गुरू गोसाव्यांची आणि इतकेच काय महान संकल्प देणाऱ्या ग्रंथांची अगदी रेलचेल असते. मायावी सैतान, रावण किंवा मनोविकार मनात आधी संभ्रम निर्माण करतात. बुद्धी भ्रष्ट करतात आणि मग अगदी सहजपणे बळी घेतात. त्यामुळेच 'विनाशकाले विपरीत बुद्धी' ही म्हण खूपच सार्थ वाटते. **बुद्धी आणि चातुर्य यात एक फरक आहे. चातुर्य माणसाला जीवनाकरिता आवश्यक असलेल्या व्यवसायाला शीघ्रतेने आत्मसात करण्याची क्षमता देते. परंतु बुद्धी ही परमेश्वराने दिलेल्या चातुर्याचा व तल्लख मेंदूचा यथोचित वापर करण्याची क्षमता देते; जीवनाचे सार काय आहे, असार काय आहे किंवा योग्य आणि अयोग्य काय यांची पारख करण्याची शक्ती देते.** परंतु आज विवेक भ्रष्ट झाल्यामुळेच सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळला आहे. थिल्लर गोष्टींची मनाला चटक लागली आहे. परिणामत: मनुष्य इतका विवेकशून्य झाला आहे की तो गंगेत स्नान केल्याने पापे नष्ट होतात; असा गैरसमज मनात बाळगून, परमेश्वराच्या दलालांनी केलेल्या मंत्रघोषात गंगेच्या गढूळ पाण्यात स्नान उरकून घेतो, त्यातच धन्यता मानतो.

डॉ. एन्. एन्. वोग, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मनोरुग्ण विशेषज्ञ सांगतात की 'आध्यात्मिक शून्यता' ही विवेकशून्यता निर्माण होण्याची प्रथम पायरी आहे. मग जीवनात चुकीचे विचार बाळगून, चुकीचे निर्णय घेत गेल्यामुळे माणसाच्या अधोगतीला सुरुवात होते. विकर्मांचे ओझे वाढायला लागते. याची परिणती असाध्य दुर्धर रोग, वेदना व यातना यात होते. मग मृत्यूपूर्वीची अनेक वर्षे अंथरुणात असहाय परिस्थितीत दुर्धर रोगाच्या असह्य यातना व जवळच्या आप्तेष्टांकडून प्राप्त कटू बोल ऐकून होणाऱ्या मानसिक यातना भोगत- भोगत कशीबशी संपतात. काही व्यक्ती ज्यांना कर्माची गुह्य गती माहीत नाही, ते आत्महत्या देखील करतात. त्यांना हे माहीत नसते की उर्वरित कर्माचा बोझा पुढील जीवनात जन्मापासूनच विभिन्न यातनांचा उपहार घेऊन येतो.

## कर्मयोग काय आहे?

कर्मयोग म्हणजे काय, याबाबतचा संभ्रम अफाट आहे. उदाहरणार्थ एक निष्णात डॉक्टर असे समजतो की तो करीत असलेली रुग्ण सेवा

**आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे मागील जन्मातील संचित कर्माप्रमाणेच माणसाला या जन्मात शरीरयष्टी, सुख-समृद्धी आणि व्यवसाय प्राप्त होतो, या सर्व गोष्टींची जाणीव मला ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर वाचल्या जाणाऱ्या ईश्वरीय ज्ञानमुरली मुळेच प्राप्त झाली.**

एक श्रेष्ठ कर्मयोग आहे. त्यामुळे त्याचे श्रेष्ठ कर्माचे खाते नेहमीच वाढत राहणार आहे. परंतु कर्माच्या सिद्धांताप्रमाणे रुग्ण सेवेकरिता मिळत असलेले धन, वैभव व समाजातील प्रतिष्ठा यांच्या रूपाने, श्रेष्ठ कर्माचा संपूर्ण मोबदला त्याला मिळत असतो. फलस्वरूप पुढील जन्माकरिता लागणाऱ्या संचित कर्माचे खाते निरंकच राहते. याशिवाय आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे मागील जन्मातील संचित कर्माप्रमाणेच माणसाला या जन्मात शरीर यष्टी, सुख-समृद्धी आणि व्यवसाय प्राप्त होतो. या सर्व गोष्टींची जाणीव मला ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर वाचल्या जाणाऱ्या ईश्वरीय ज्ञानमुरलीमुळेच प्राप्त झाली. परिणामत: कर्माची गुह्य गती काय असते, हे समजायला लागले. तसेच मी एक आत्मा दिव्य ज्योतिर्बिंदू स्वरूप आहे, शरीर नाही; हे अमूल्य ज्ञान देखील मिळाले. त्यामुळे मृत्यूबद्दल मनात असलेली भीती नाहीशी झाली. परमेश्वराबद्दल असलेले निरनिराळे संभ्रम दूर झाले. परमात्मा शिव हे मज आत्म्याचे परमपिता, परमशिक्षक व सद्गुरू आहेत, हे स्पष्टपणे कळले. माझे परमपिता शिव, माझ्यासारखेच एक ज्योतिर्बिंदू स्वरूप आहेत, हे स्पष्ट झाले. ते अजन्मा आहेत म्हणजे जन्म मरणाच्या चक्रापासून मुक्त आहेत. **योग म्हणजे स्वत:ला आत्मा समजून, परमात्मा शिव पित्याची मोठ्या प्रेमाने आठवण करणे, हे देखील स्पष्ट झाले. याद्वारेच आपल्या विकर्मांचा विनाश होतो.** अशाप्रकारे ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर शिकविला जाणारा राजयोग नियमितपणे, सकाळी ४ वाजता उठून, अमृतवेळेला केल्यामुळे लेखकाचे सात असाध्य आजार दूर झाले आहेत. अर्थात या आजारांकरिता कारणीभूत असणाऱ्या विकर्मांचा विनाश झाला आहे.

## भक्तियोग म्हणजे काय?

या विषयी देखील लेखकाच्या मनात खूपच संभ्रम होता. एके दिवशी अमृतवेळेला योगाच्या दरम्यान एक संकल्प निर्माण झाला आणि संभ्रमाचे सावट क्षणात दूर झाले. आपण सर्व याचे अनुभवी आहोत की कठीण परिस्थिती येताच, माणसाला परमेश्वराची आठवण येते. अशाप्रसंगी, आपला एखादी शुभचिंतक येऊन सूचना करतो, ''अरे मित्रा, 'ॐ नमो शिवाय' या महामंत्राचे दररोज सहस्त्र वेळा २१ दिवस जप करून बघ. म्हणजे हमखास परिस्थिती दूर होईल.'' पीडित व्यक्ती या महामंत्राचे उच्चारण सुपर फास्ट ट्रेनच्या गतीने करावयास लागते. जलद धावणारे मन या सहस्त्रनाम पठणात गती भरत असते. इतर दैनंदिन कर्माप्रमाणे हे देखील कर्म लवकरात लवकर उरकून घ्यावे म्हणजे टीव्ही वरील सिरीयल्स् बघायला मोकळे होता येईल. अशा रितीने भक्ती करताना मन-बुद्धी ईश्वराशी एकाग्र न होता इतरत्र भटकत राहते; म्हणूनच गायन केले जाते, 'जनम-जनम लगाये फेरे, फिर भी हरदम दूर रहे.' जन्मजन्मांतर आपण भक्ती केली तरी ईश्वर प्राप्ती मात्र झाली नाही. केवळ अल्पकाळाची प्राप्ती होत गेली.

## राजयोग म्हणजे काय?

या विषयाबाबत लेखकाच्या मनात एक भीती निर्माण झाली होती. याचे मुख्य कारण म्हणजे 'इस्कॉन'मधील प्रभृतींची विद्वता प्रचुर भाषणे. अगदी मन लावून सतत चार वर्षे त्यांची भाषणे ऐकली होती. 'हरे राम, हरे कृष्ण' या मंत्राचे स्मरण व चिंतन करणे म्हणजेच मोक्ष मिळविण्याचा सर्वात सोपा व सुरक्षित उपाय आहे; अशी भावना मनात दृढ झाली होती. राजयोग म्हणजे परमेश्वराची ओळख बुद्धीच्या निकषावर करून घेण्याचा मार्ग, अत्यंत कठीण व घातक मार्ग आहे, असा गैरसमज निर्माण झाला होता. परंतु जेव्हा मी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या मुंबई येथील कुलाबा सेवा केंद्रावर सात दिवसांचा कोर्स केला तेव्हा माझ्या मनातील सर्व प्रकारचे भ्रम व अंधविश्वास दूर झाला. **मला हे लक्षात आले की श्रीराम किंवा श्रीकृष्ण हे परमेश्वर नाहीत तर देवात्मा आहेत. परमात्मा एक निराकार शिव परमात्मा आहे तोच पतितपावन, पापकटेश्वर, मुक्तेश्वर व सद्गतिदाता आहे. जसजसे मी ज्ञानमुरलीचे अध्ययन करू लागलो. तस तसा भक्तिमार्गातील गुंता सुटत गेला.**

परमपिता शिव परमात्मा कित्येक ज्ञानमुरलीतून स्पष्टपणे सांगतात - ''भक्तिमार्गात धक्के खाऊन, शास्त्रीय ग्रंथ वाचून, साधु-संतांची विद्वता प्रचुर प्रवचने ऐकून, तुम्ही थकून गेले आहात. तुम्ही माझी लाडकी मुले असल्यामुळे सुख, शांती, आनंद, प्रेम...

पान क्र. ३२ वर

# मूल्य शिक्षण – एक शैक्षणिक क्रांतिकारी चळवळ

**ब्र.कु. विकास भाई,** नाशिक

**एक प्रतिज्ञा असे अमुची, ज्ञानाची साधना ।**
**चिरंतन ज्ञानाची साधना ।**
**ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।।**

**-कविवर्य कुसुमाग्रज**

''मूल्य शिक्षणाद्वारे ज्ञान गंगा घरोघरी'' या वाक्याची स्पष्टता करणे हे आज वर्तमान स्थितीत खूप महत्त्वाचे झालेले आहे. शिक्षण हा मानवीय प्रगती, परिवर्तन आणि प्रेरणा यांचा आधारस्तंभ आहे. शिक्षणाद्वारे ज्ञानाची प्राप्ती होते, पण ते ग्रहण करण्याची व त्याप्रमाणे आपली जीवन शैली बनविण्याची जबाबदारी आपल्यावरच असते.

आपल्या शिक्षणाला इंग्रजी भाषेत EDUCATION म्हणतो. जर वैचारिक पातळीवर ज्ञानाच्या आधारे विचार केला तर खालील शाब्दिक पैलूंनी EDUCATION चा अर्थ असा सांगता येईल...

E : Excellence - उत्कृष्टता;
D : Discipline - शिस्तबद्धता;
U : Understanding - समजूतदारपणा
C : Character Building - चरित्रनिर्माणता
A : Abilities - क्षमता
T : Transformation - परिवर्तनशीलता
I : Integrity -एकात्मता-सचोटी
O : Optimism - आशावादीपणा
N : Nobility - सज्जनशीलता

EDUCATION च्या प्रत्येक अक्षरात मूल्य अर्थात गुण आहेत. याचाच अर्थ शिक्षणाचा खरा आधारस्तंभ मूल्य शिक्षण आहे. परंतु आज महानगरातील कॉर्पोरेट जगतापासून तर अगदी ग्रामीण भागातील छोट्या वस्तीपर्यंत मूल्य शिक्षणाच्या आवश्यकतेबद्दल एक नवी जागृती होताना दिसत आहे. तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे विज्ञानाची प्रचंड शक्ती कुणाच्याही हातचं खेळणं बनत आहे व त्याचे होणारे दुष्परिणाम जगभर दिसत आहेत.

जगाच्या कोणत्याही भागात होणारे बॉम्बस्फोट, नगण्य कारणावरून होणाऱ्या हत्या, दहशतवादाचा वाढता प्रसार, वाढता भ्रष्टाचार, कोसळणारी कुटुंबव्यवस्था, क्षुल्लक कारणाने होणाऱ्या आत्महत्या, पर्यावरणाचा विध्वंस, त्याचा ऋतुचक्रावर झालेला गंभीर परिणाम या सगळ्यामागे ढासळती जीवन नैतिक मूल्ये असल्याचे सगळीकडे बोलले जाताना दिसत आहे. एकीकडे शिक्षणाचा व तंत्रज्ञानाचा विकास होत असताना, माणसाच्या जीवनात सुख शांतीचा मात्र अभाव निर्माण होत आहे. यासाठी अध्यात्म, मूल्य शिक्षण व विज्ञान यांचा समन्वय साधून, मूल्यनिष्ठ समाजाची पूर्णतः बांधणी करणे खूप गरजेचे आहे.

**शिक्षणाचा मुख्य उद्देश हा आंतरिक मूल्याचा विकास करणे, सृजन शीलता या गुणांचा विकास करून जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणींचा सामना करण्यासाठी सक्षम बनविणे होय.** आजच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारीरिक विकासा करिता योगासने, व्यायाम, आरोग्य, आहार यांचे शिक्षण देण्यात येते. वैज्ञानिक उन्नती करण्यासाठी ते शिक्षण आवश्यक आहे. तसेच सांस्कृतिक व सामाजिक समाजसेवेकरिता पण नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आहे; पण आज आवश्यकता आहे ती मूल्य शिक्षणाची. **मूल्य शिक्षणाद्वारे आपल्या अभिवृत्तीचा विकास करून, स्वतःची सत्य ओळख होऊन, आपल्यातील दैवी संस्कारांची जागृती होते. आपल्या विवेक शक्तीच्या विकासाद्वारे मनुष्याला व्यर्थ चिंतनाची आणि नकारात्मक कर्माची जाणीव होऊन, सत्कर्म करण्यासाठी मदत होते.** मानवीय संबंधामध्ये सत्यता, प्रेम, सहानुभूती या मानवीय गुणांची उपलब्धी होते. आंतरिक चेतनाच्या प्रगतीद्वारे आध्यात्मिकतेला जीवनात स्थान प्राप्त होते.

येत्या २०२० वर्षामध्ये भारत जगातले सर्वात तरुण राष्ट्र ठरणार आहे. त्यावेळी जगाच्या एकंदर सर्व मनुष्यबळाच्या २५% मनुष्यबळ भारतीय युवकांचे असणार आहे. उच्च शिक्षण घेतलेली आणि तंत्रज्ञानाशी परिचित असलेली ही प्रचंड भारतीय युवा शक्ती जगाच्या सर्व व्यवहारांवर प्रभाव टाकणारी आहे. हा नवा भारत खऱ्या अर्थाने प्रभावी ठरायचा असेल तर आत्तापासून उदात्त नीतिमूल्यांची जोपासना करायला हवी. उद्याच्या मूल्यशिक्षित समाजाची निर्मिती करण्याचे आव्हान पेलण्यासाठी शैक्षणिक क्षेत्राकडून पुढाकार घेतला जाण्याची गरज आहे. आज आपल्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांनी राज्य स्तरावर 'मूल्यशिक्षण' या अभ्यासक्रमाद्ववारे पाऊल उचललेले आहे. या नावीन्यपूर्ण उपक्रमाला साथ

देण्यासाठी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयामार्फत ''राजयोग शिक्षा प्रभाग आणि शोध प्रतिष्ठान मा. आबू राजस्थान'' मार्फत सन २०१२ मध्ये सामंजस्य करार केला गेला आहे. **या करारामध्ये पहिल्या टप्प्यात पहिले वर्ष पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास डिप्लोमा (पदविका) मूल्य आणि आध्यात्मिक शिक्षण यांची पदविका दिली जाते. त्यानंतर प्रगत (ॲडव्हान्स) पदविका व शेवटी बी.ए. मूल्य आणि आध्यात्मिक शिक्षण ही पदवी दिली जाते. या विषयांची मांडणी अतिशय शास्त्रशुद्धपणे मूल्य शिक्षणाद्वारे व्यक्तिमत्व विकासाचे लक्ष्य ठेऊन केलेली आहे.**

या अभ्यासक्रमात ध्यान अभ्यासाचा विधी व राजयोग, सार्थक जीवनाकरिता मूल्ये, आध्यात्मिकतेचा शोध, पर्यावरण जागरूकता व गुणवत्तापूर्ण श्रेष्ठ जीवन, सफल जीवनाकरिता मूल्ये, उद्देश पूर्ण जीवनाकरिता सिद्धांत, उत्कृष्ट जीवनाकरिता मूल्ये, क्रोध आणि तणाव यावर विजय, मुख्य धर्म व अध्यात्म, आध्यात्मिक जीवन शैली, जीवन कौशल्ये, मी आणि माझे सामाजिक वर्तन, अध्ययन कौशल्ये, आपत्ती व्यवस्थापन तसेच हिंदी आणि इंग्रजी भाषेचा परिचय या विषयांद्वारे मूल्य शिक्षणाचा पाया मजबूत केला जातो. परीक्षेसाठी ६०० गुण असतात. या शिक्षणक्रमाची अभ्यास केंद्रे संपूर्ण महाराष्ट्रात ३७ ठिकाणी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयामार्फत चालवली जातात. सर्व विद्यार्थ्यांसाठी ब्रह्माकुमारीजतर्फे प्रशिक्षित समंत्रका द्वारे (काउन्सिलर द्वारे) सामंत्रण सत्र चालविले जाते. या शिक्षणक्रमासाठी पात्रता १२ वी पास आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी १० किंवा १२ नापास असेल तर पूर्वतयारी शिक्षणक्रमाद्वारे तो आपला प्रवेश निश्चित करू शकतो. मराठी/हिंदी/इंग्रजी माध्यमातून पुस्तके उपलब्ध आहेत. मागील तीन वर्षापासून महाराष्ट्रात ३५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी या अभिनव बी.ए. पदवीचा लाभ घेतला आहे. पदवीधारकांनी प्रकल्प सादर केलेले आहेत. यात नारी सशक्तीकरण, युवा सशक्तीकरण, व्यसनमुक्ती, तृतीय पंथामध्ये मूल्य शिक्षणाचे स्थान अशा विविध विषयांची हाताळणी केलेली आहे. **सर्व अभ्यास केंद्राचे संचालन नोडल सेंटर ब्रह्माकुमारीज नाशिक तर्फे केले जाते. येत्या नवीन शैक्षणिक वर्षी २०१७-१८ करिता प्रथमच on-line द्वारे ycmou. digitaluniversity.ac या संकेत स्थळावर जाऊन प्रवेश घेता येऊ शकतो. अधिक माहितीसाठी आपण नोडल सेंटर अधिकारी बी.के.विकास भाई यांच्याशी ८६९-८६९-५५२७ या फोन वर संपर्क करू शकता.**

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराबरोबर समाजापुढे विशेषता शैक्षणिक विश्वापुढे उभी असलेली मूल्याधारित शिक्षणाची गरज भागविण्याकरीता, उचललेले हे पाऊल खूप अभिनंदनास्पद आहे. ज्ञानाची ही गंगा अशीच वाहत जावो व शेवटी सर्व मूल्यांचा सागर असलेल्या परमपिता परमात्म्याशी विलीन होवो; हीच मंगलकामना!

पान क्र. २६ वरून

सुद्धा एक झोपडी, ती सुद्धा कुडाची, याच झोपडीत सर्व शास्त्रमणी गीतेवर आधारित ज्ञानेश्वरीचा जन्म झाला. संत रामदास स्वामी तर केवळ एक लंगोटी परिधान करीत. त्यांनी दासबोध सारखा महान ग्रंथ लिहिला. स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, लाल बहादुर शास्त्री यांचे देखील राहणीमान अतिशय साधे होते; परंतु त्यांचे विचार किती उच्च होते. वर्तमान संगमयुगातील पिताश्री ब्रह्माबाबांची जीवनगाथा सुद्धा आपण जाणतो. त्यांची राहणी किती साधी होती. एक सफेद धोतर व एक सफेद कुर्ता. छोट्याशा झोपडीत बसून बाबा योग-तपस्या करीत व यज्ञवत्सांना पत्र लिहित असत. त्यांचा एक-एक संकल्प इतका महान होता की त्याद्वारेच नवसृष्टीची स्थापना होते. याचेच अविनाशी गायन केले जाते- 'ब्रह्माने आपल्या संकल्पाने सृष्टीची स्थापना केली'.

**तणावमुक्त जीवन**

आजकाल सर्वत्र अगदी ४ ते १० वर्षाच्या मुलाच्या तोंडून सुद्धा 'टेन्शन' हा शब्द सहज ऐकायला मिळतो. विद्यार्थ्यांना परीक्षेचे टेन्शन, युवकांना नोकरीचे टेन्शन, वृद्धांना आजारपणाचे टेन्शन... या टेन्शन अर्थात तणावावर आदरणीय दादी गुलजारजी क्लासमध्ये सांगतात, ''कभी भी आपको टेन्शन आता है, तो टेन्शन के पहले 'A' लगाओ।'' अर्थात प्रत्येक संकल्प, बोल व कर्म जर अटेंशन (सावधान) पूर्वक केले तर टेन्शन आपोआपच समाप्त होईल.

**वर्तमान समयी परमपिता शिव परमात्मा, पिताश्री ब्रह्माबाबांच्या द्वारे तणावमुक्त दुनिया (Tension Free World) अर्थात स्वर्णिम दुनियेची स्थापना करीत आहोत. अशावेळी जर आपण प्रत्येकाने ईश्वरीय जी.एस. टी. व्यवहारात आणला तर खरोखरच नजीकच्या भविष्यकाळात 'तणावमुक्त विश्व' स्थापन होईल यात शंका नाही. तसेच त्यात आपल्याला उच्च देवीदेवता पदाची प्राप्ती देखील हमखास होईल.**

# बिगडी को बनानेवाला बाबा ! [अनुभव]



**ब्र.कु. श्रीहरी श्रृंगारे**, 'रहाटगाव' (अमरावती)

बालपणी माझ्यावर आईवडिलांनी खूप चांगले संस्कार केले होते, परंतु कॉलेज जीवनात वाईट मित्रांच्या संगतीने मी पूर्णपणे बिघडलो. 'ढेकणाच्या संगे, हिरा तो भंगला' अशी माझी स्थिती झाली. मी इतका बिघडलो की मला अक्षरशः वेड लागले. त्यामुळे मला वेड्यांच्या इस्पितळात दाखल करण्यात आले. तेथे मला इलेक्ट्रीकचे शॉक देण्यात आले. त्यामुळं वेड बरं झालं परंतु शॉकचा माझ्यावर विपरीत परिणाम झाला व माझी वाचा तात्पुरती बंद झाली. माझी आई लहानपणीच वारली होती. त्यामुळे माझ्या वडिलांनी, मी बरं व्हावं म्हणून खूप उपास-तापास केले. देवाला नवस केले. (कदाचित त्यांच्याच प्रयत्नांमुळे शेवटी मी सुधारलो असेल.) पुरेसं शिक्षण नसल्याने माझ्या नोकरीचा प्रश्नच येत नव्हता. म्हणून वडिलांनी चरितार्थाचं साधन म्हणून रिक्षा घेऊन दिली व एक वेडसर मुलगी शोधून, तिच्याशी लग्न लावून दिले. कसंबसं माझ्या जीवनाचं रहाटगाडगं सुरू झालं.

पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती झाली. रिक्षा चालकांमध्ये मला असे काही साथी मिळाले की त्यांनी मला पुन्हा दारू, गांजा,चरस, विडी पिणे या सर्व वाईट सवयी लावल्या. एके दिवशी मी असाच दारू पिऊन रिक्षा चालवित असताना मोठा ॲक्सीडेंट झाला. त्यात माझ्या डोक्याला मार लागला व १७ टाके पडले. माझ्या ह्या अशा बेताल वागण्याला माझी बायको देखील वैतागली. ती तरी किती सहन करणार? शेवटी मला घटस्फोट देऊन ती माहेरी निघून गेली. त्यामुळे माझं जीवन पुन्हा एकाकी झालं

**मी स्वतःला बदलू शकलो नाही-**

त्यामुळे मी रोज देवाला प्रार्थना करू लागलो की आता मला चांगली बायको दे म्हणजे मी सारी व्यसने सोडून देईल. सुदैवाने तसा योग जुळून आला व मला एक चांगली बायको मिळाली. मी व्यसनांचा त्याग केला; परंतु तिला मूल-बाळ मात्र होत नव्हतं. याचा परिणाम असा झाला की काही वर्षानंतर माझी व्यसने पुन्हा सुरू झाली. तसेच मूलबाळ होत नसल्याने मी तिला घटस्फोट दिला व तिसरं लग्न केलं. तिला मात्र एक कन्यारत्न झालं. आता सर्व ठीक चाललं होतं, परंतु मागे मी दोन बायकांना घटस्फोट दिल्याने त्यांनी माझ्यावर कोर्टात केसेस टाकल्या होत्या. त्यामुळे वरचेवर कोर्टात फेऱ्या माराव्या लागत होत्या. 'शिंगरू हेलपाट्याने मेलं' अशी माझी गत झाली होती. अशा परिस्थितीत मी पुन्हा व्यसनांच्या विळख्यात सापडलो. परिणामतः घरात वरचेवर पत्नीशी भांडणे होऊ लागली. याला वैतागून माझी तिसरी पत्नीसुद्धा मला सोडून, आपल्या माहेरी निघून गेली. गावातील सर्व लोक मला एकदम थर्ड क्लास माणूस समजायला लागले. मी दिसताच माझ्यापासून दूर निघून जाऊ लागले. शेवटी अशा जीवनाला मी देखील कंटाळलो व आत्महत्या (जीवघात) करण्याचा निर्धार केला.

**'मेरा बाबा' हा जादूचा मंत्र-**

माझे नशीब बलवत्तर असल्याने मला एक ब्रह्माकुमार भाई भेटला. त्याच्यापुढे मी माझे सर्व दुःख प्रकट केले. तेव्हा तो म्हणाला की, ''तू जीवघात नंतर कर; परंतु त्या आधी सृष्टीवर अवतरित झालेल्या ईश्वर पित्याकडून वारसा तर प्राप्त करून घे''. या गोष्टीने मी खूप आकर्षित झालो व त्या भाईबरोबर ब्रह्माकुमारी आश्रमात गीतापाठशाळेत गेलो. पहिल्याच दिवशी मला तेथे अद्भुत शांतीचा अनुभव झाला. त्यामुळे मी रोज गीता पाठशाळेत जाऊ लागलो. खरं तर मला तेथे जायला लाज वाटत होती; कारण मी रोज सकाळी चहा ऐवजी दारू पित होतो. तरी देखील मी तेथे जाणे मात्र सोडले नाही. फलस्वरूप मी हळूहळू व्यसनातून मुक्त होत गेलो. **एक वर्ष नियमितपणे गीता पाठशाळेत जात असल्याने, मला मधुबन जायची संधी प्राप्त झाली. त्या संधीचं मात्र मी सोनं केलं. तेथे दहा दिवस मी अतिशय उमंग-उत्साहाने सेवा केली. कितीही सेवा केली तरी मला थकवा जाणवला नाही. ज्या दिवशी प्राणेश्वर बापदादांचे अवतरण झाले त्या दिवशी मी माझे सर्व अवगुण बाबांना देऊन टाकले.** त्यावेळी मी बापदादांना मनोमनी हेही सांगितले की मी आता मायेच्या दुनियेत परत जाऊ इच्छित नाही. तेथे गेल्यावर माया पुन्हा आपल्याकडे आकर्षित करेल. तसेच माझे संस्कार तमोप्रधान असल्याने पुन्हा वाईट व्यसने लागतील, **तेव्हा बापदादांनी मला संकल्प दिला की तू केवळ हिंमतीचं एक पाऊल टाक म्हणजे मी तुला हजार पावलांची मदत करीन. त्यानुसार शिवबाबा मला आजही मदत करीत आहेत व पुढेही करत राहतील, हा माझा विश्वास आहे.**

**माझे घर स्वर्ग बनले-**

मधुवनहून आल्यानंतर माझे जीवन पूर्णतः बदलून गेले. मी आता १००% निर्व्यसनी बनलो होतो व मायाजीत बनण्याचा पुरुषार्थ करत होतो. माझ्या तिसऱ्या पत्नीशी असलेले विवाद मिटले. एवढंच नाही तर माझी पत्नी देखील सोबत ज्ञानात चालू लागली. आम्ही रोज सकाळी अमृतवेळेला उठून , शिवबाबांची मोठ्या प्रेमाने आठवण करतो. नियमित गीता पाठशाळेत ज्ञानमुरली ऐकायला जातो. सर्वांशी अतिशय प्रेमाने वागतो. फलस्वरूप आमचे घर नर्कापासून स्वर्ग बनले आहे. ईश्वरीय संगाचा रंग लागल्याने आमची दृष्टी, वृत्ती पवित्र बनली आहे. गावातील लोक मला आधी थर्ड क्लास समजत होते; ते आता मोठ्या आदरपूर्वक 'ओम शांती श्रीहरी भाई' असे म्हणतात. असे हे अद्भुत परिवर्तन पाहून मनाला जो आनंद होतो, तो खरोखर अवर्णनीय असा आहे. ही सारी किमया माझ्या शिवबाबांची आहे. आता केवळ 'मी आत्मा व माझे शिवबाबा' हाच भाव अंतरंगी भरलेला असतो.

**मनसा, वाचा, कर्मणा सेवेची लागलीसे गोडी-**

**आता ईश्वरीय नशेच्या पुढे अन्य कुठलीही नशा आठवत सुद्धा नाहीत. शिवबाबांच्या श्रीमतावर चालण्याची मला गोडी लागली. त्यामुळे याद व सेवा हा जणू माझ्या जीवनाचा श्वास बनला आहे.** शिवबाबांच्या कृपेने मी एक रिक्षा खरेदी केली आहे. तिच्या मागच्या बाजूला सृष्टिचक्राचे मोठे चित्र लावले आहे व आतल्या बाजूला प्रदर्शनाची चित्रे लावली आहेत. रिक्षेला शिवबाबांचा एक झेंडा लावला आहे. जोही प्रवासी रिक्षेत बसेल त्याला मी मोठ्या प्रेमाने शिवबाबांचा परिचय देतो. त्यांना हे समजावून सांगतो की जसा आपल्या शरीराचा पिता आहे तसाच आत्म्याचा परमपिता शिव परमात्मा आहे. तो आता सृष्टीवर अवतरित होऊन, आपल्याला विश्वाची बादशाही देत आहे. अशा प्रकारे शिवबाबा माझ्याकडून मनसा-वाचा-कर्मणा सेवा करवून घेत आहेत. या सेवेतून मला इतकी खुशी प्राप्त होते की मी सदा उडती कला अनुभवत असतो. माझ्यातील हे परिवर्तन पाहून माझे वडील खूप खुश असतात आणि ईश्वराकडे हेच मागणं मागतात की, जन्मोजन्मी हाच मुलगा मला लाभो.

**शेवटी माझी सर्व वाचक बांधवांना हीच कळकळीची विनंती आहे की वर्तमान संगमयुगात आपल्या सर्व मुलांना अर्थात सर्व आत्म्यांना सद्भाग्यशाली बनविण्यासाठी परमात्मा शिव पित्याचे अवतरण सृष्टीवर झाले आहे. त्यांना ओळखा. त्यासाठी ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या जवळच्या सेवाकेंद्राला अवश्य भेट द्या. म्हणजे तुमच्याही मनात हेच गीत वाजत राहील.-**

**''दिल कहे बाबा तेरा शुक्रिया**
**तूने ही भाग्य बनाया है ।**
**हर पल तेरे गुण गाऊं,**
**बाबा पल पल तेरे गुण गाऊं मैं ।''**

**पान क्र. २८ वरून**

द्या. सर्वांवर तुमचा वारसा हक्क आहे. परंतु भक्तिमार्गात सदर गोष्टींसाठी तुम्ही भीक मागत राहता. त्यामुळे आता शास्त्र, ग्रंथ इत्यादी वाचू नका. जे काही वाचले आहे किंवा निरनिराळ्या गुरूंकडून ऐकले आहे. ते सर्व विसरून जा. **आता या संगमयुगात ब्रह्मामुखाद्वारे मी जे ज्ञान देतो, तेच ऐका. त्याचेच मनन-चिंतन करा आणि त्या ज्ञानाचे स्वरूप बना म्हणजे विश्वापुढे परमेश्वराला प्रत्यक्ष करणारे, विश्वकल्याणकारी श्रेष्ठ आत्मा बनाल. भौतिक संपदा, मान-मरातब इत्यादी क्षणभंगूर गोष्टींचा त्याग केल्यानेच तुमचे श्रेष्ठतम भाग्य जमा होईल. गृहस्थ व्यवहारात राहून कमलपुष्पसमान जीवन जगा. त्याग, तपस्या व सेवा यांच्या जोरावर तुम्ही ब्रह्माबाबांसारखे स्वत:चे श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व निर्माण कराल.** या श्रेष्ठतेच्या आधारावर, निकट भविष्यात येणाऱ्या सत्ययुगात विश्वमहाराजन वा विश्वमहाराणी हा किताब प्राप्त कराल. सत्ययुग व श्रेतायुगात (२५०० वर्षे) संपूर्ण स्वर्गीय सुख प्राप्त कराल. त्यानंतर द्वापर युगात व कलियुगात तुमच्या प्रतिमेची देवीदेवता स्वरूपात मंदिरातून पूजा अर्चना केली जाईल शेवटी पुन्हा संगमयुगात शुद्रपणाचे विकार व संस्कार यांचा त्याग करून 'ब्राह्मण' बनण्याचे सद्भाग्य प्राप्त कराल. सदाकाळची खुशी व अतींद्रिय सुख हेच ब्राह्मण जीवनातील सर्व श्रेष्ठ भाग्य आहे. तुमचा सदा हर्षित चेहरा, मधुर बोल व सभ्यतापूर्ण व्यवहार अन्य आत्म्यांना परमेश्वराकडे आकर्षित करतील. मग तुम्ही विश्वाचे आधारमूर्त व उद्धारमूर्त बनून जाल. तुमच्या जीवनात अप्राप्त अशी कुठलीच गोष्ट राहणार नाही.'' लेखकाचा स्वानुभव सांगतो की राजयोग शिकून तर पहा. स्वत: अनुभव घ्या आणि मगच खात्री करा.